cmyk

## संपादकीय

### संशयकल्लोळ लोकशाहीला परवडणारा नाही

लोकसभेतील विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा एका लेखाच्या माध्यमातून देशातील निवडणूक यंत्रणेबाबत संशय व्यक्त केला आहे. या संशयाला उत्तर देताना निवडणूक आयोगाने आणि सरकारी यंत्रणांनीसुद्धा नेहमीच्याच पद्धतीने स्पष्टीकरण दिले आहे. राहुल गांधी यांनी आपल्या पूर्वीच्याच आरोपांची पुन्हा एकदा नव्याने मांडणी केली आहे आणि निवडणूक आयोगानेसुद्धा पूर्वीच्याच पद्धतीने नव्या आरोपांना उत्तर दिले आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–४७ | मंगळवार, दि.१० जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### शासकीय अधिकाऱ्यावर गाडी घातल्यास मोक्का लावणार–अजित पवार

पुणे: प्रशासकीय अधिकारी आपले काम करत असतात. अवैद्य वाळू उत्खनन रोखण्यासाठी आणि कारवाई करण्यास जातात. त्यावेळी काही मस्तवाल लोक त्यांच्यावर गाडी घालण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे अधिकाऱ्यांवर गाडी घालणाऱ्यांवर मोक्काची कारवाई केली जाणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित महसूल लोक अदालतीत ते बोलत होते. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावणकुळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी आदी उपस्थित होते. पवार म्हणाले, अशा लोकांची मस्ती कमी करण्याचे काम आम्ही करू. त्यांना चक्कीत टाकून पिसू. त्यांचा मस्तवालपणा उतरवण्याची धमक आणि ताकत सरकारमध्ये आहे.

# खरीप पेरणीला १४ जूनपर्यंत ब्रेक लागणार!

## शेतकऱ्यांची चिंता वाढली, हवामान विभागाचे मोठे भाकित

**पुणे । प्रतिनिधी**

**सध्या शेतकरी पेरणी करण्यासाठी मोठ्या पावसाची वाट पाहात आहेत. असे असतानाच आता हवामान विभागाने मोठे भाकित केले आहे. खरीप पेरणीसाठी १४ जूनपर्यंत वाट पहावी लागणार असून मराठवाड्यासह इतर भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. मात्र १४ जूनपर्यंत मोठा पाऊस पडणार नसल्याचेही हवामान विभागाने म्हटले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.**



भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा हवामान अंदाज व्यक्त केला आहे. येणाऱ्या ४८ तासांत म्हणजेच ९ आणि १० जून रोजी राज्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील वेगवेगळ्या ठिकाणी मेघगर्जना तसेच सोसाट्याच्या वाऱ्यासह हा पाऊस होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. पान २ वर

### तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत वाढणार

हवामान तज्ज्ञांच्या मतानुसार महाराष्ट्रातील काही भागात तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे. आगामी आठवड्यात विदर्भ, मराठवाडा, खान्देश या भागात ४० अंश सेल्सिअसपर्यंत तापमान जाऊ शकते. पूर्व विदर्भात तर याहूनी जास्त पारा वर जाण्याची शक्यता आहे. सध्या मोठ्या शक्यता नसली तरी कोकण, मुंबई, पुण्यातील काही भागांत पावसाच्या सरी बरसत आहेत. त्यामुळे तेथील नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळतोय.

### १४ जूनपर्यंत मोठा पाऊस नाही

राज्यातील शेतकरी पेरणी करण्याचा विचार करत असतील तर त्यांनी काही दिवस थांबावे असे आवाहन हवामान विभागाने केले आहे. तसेच १४ जूनपर्यंत राज्यात मोठा पाऊस होण्याची शक्यता नाही, असेही हवामान विभागाने म्हटले आहे. त्यामुळे आता मोठ्या पावसाची वाट पाहात असलेल्या शेतकऱ्यांची एकाप्रकारे चिंता वाढली आहे. किनाऱ्यालगतचे जिल्हे वगळता अन्य भागात मोठी गरमी होण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.

## थोडक्यात...

### ठाकरे बंधू राजकारणातल्या बुडत्या नावेत बसलेत– शहाजी बापू

सांगली–ठाकरे बंधू एकत्र येण्यावर शहाजी बापू पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, ठाकरे बंधू राजकारणातल्या बुडत्या नावेत बसलेत. दोघे एकत्र आले तरी त्यांचा राजकीय उद्धार होणारच नाही असे खोचक वक्तव्य त्यांनी केले आहे.

### गोंदिया तापले

गोंदिया–मृग नक्षत्र सुरू होऊन सुध्दा पावसाचे आगमन झालेले नाही. उलट तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. गोंदिया जिल्ह्यात ४२.१ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद घेण्यात आली आहे. शनिवार ७ जूनला ३८ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद घेण्यात आली होती. मात्र, अचानक तापमानात वाढ झाली असून ४२.१ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद गोंदिया जिल्ह्यात घेण्यात आली आहे. तर या उन्हामुळे वातावरणात प्रचंड उकाडा निर्माण झाला असून या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत

### सोलापूर–गोवा विमानसेवेला सोमवारपासून सुरुवात

सोलापूर–सोलापूर–गोवा विमानसेवेला आज (सोमवारपासून) सुरुवात होणार आहे. गोव्यावरून सोलापूरच्या दिशेने निघालेले विमान काही वेळात सोलापूर विमानतळावर दाखल होणार आहे. गोव्यावरून आलेल्या विमानाला वॉटर सॅल्यूट देण्यात येणार आहे. प्रवाशांच्या स्वागतासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार राम सातपुते आणि अन्य नेते उपस्थित आहेत.

### गजानन महाराजांची पालखी मालेगावमध्ये

मालेगाव–विदर्भातील पंढरी म्हणून ओळखले जाणारी संत गजानन महाराज यांची पालखी पांडुरंग भेटीच्या ओढीने संत नगरी शेगाव येथून मार्गस्त झालेल्या पालखीचे वाशीम जिल्ह्यात दाखल झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी मालेगाव शहरात प्रवेश करणार आहे.

### सर्व नव्या लोकलला स्वयंचलित दरवाजे असणार

मुंबई–मुंब्रा लोकल अपघातानंतर मध्य रेल्वे प्रशासनाला अखेर जागी आली असून आता सर्व नव्या लोकलला स्वयंचलित दरवाजे असतील अशी माहिती मध्य रेल्वेने दिली आहे. स्वयंचिलत दरवाज्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. दुर्घटनेनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत मध्य रेल्वेच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली आहे.

# हरियाणा, महाराष्ट्राच्या मतदारयादीचा डिजिटल डेटा राजकीय पक्षांना देणार!

## निवडणूक आयोगाचा निर्णय, काँग्रेसकडून स्वागत

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**हरियाणा आणि महाराष्ट्राची मतदार यादी राजकीय पक्षांसोबत शेअर करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे काँग्रेसने स्वागत केले आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या निर्णयाला पहिले पाऊल चांगले म्हटले आहे, परंतु त्याच वेळी हा डेटा कधी आणि कोणत्या स्वरूपात उपलब्ध करून दिला जाईल हे आयोगाने स्पष्ट करावे अशी मागणीही केली आहे.**




राहुल गांधी यांनी सोमवारी त्यांच्या एक्स अकाउंटवर लिहिले की, मतदार यादी सोपवण्याचा निवडणूक आयोगाचा निर्णय हा एक चांगला पहिला टप्पा आहे. हा डेटा डिजिटल आणि मशीन–रीडेबल फॉरमॅटमध्ये (जसे की एक्सेल किंवा सीएसव्ही) कोणत्या तारखेपर्यंत उपलब्ध होईल हे आयोग स्पष्ट करू शकेल का? त्यांनी या पोस्टसोबत एका मीडिया रिपोर्टचा स्क्रीनशॉट देखील शेअर केला आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की, निवडणूक आयोगाने या वर्षाच्या सुरुवातीला दिल्ली उच्च न्यायालयाला दिलेल्या आश्वासनानुसार पान २ वर

### सरकार लक्षच देत नाही ; मुंबई रेल्वेसाठी वेगळे महामंडळ हवे - राज ठाकरे



**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंब्रा स्थानकाजवळ चालत्या प्रवाशी पडल्याची दुर्दैवी घटना घडली. तसेच या घटनेत ८ प्रवाशांच्या मृत्यू झाला. या घटनेवरून मुंबईतील जवळपास सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी यासंदर्भात चिंता व्यक्त करत राज्यातील भाजपा सरकार आणि मध्य रेल्वेवर आरोप आणि टीकेला सुरुवात झाली.**

या पार्श्वभूमीवर मनसे प्रमुख राज ठाकरे एक पत्रकार परिषद घेत म्हणाले की, मुंबईत जो रेल्वे अपघात झाला तो दुर्दैवी आहे. या अपघातात अनेक प्रवाशांचा मृत्यू झाला, पण अशाच घटना रोज मुंबईत घडत आहेत. मुंबईत रोज प्रवासी जखमी होत आहेत आणि तरीही कोणाला काहीही देणे–घेणे नाही. मुंबई रेल्वेसाठी एक वेगळे महामंडळ हवे, ही मागणी गेले कित्येक वर्षांपासून केली जात आहे. आम्ही सुद्धा ही मागणी केली होती, पण आजपर्यंत एकाही सरकारने या मागणीकडे लक्ष दिले नसल्याचा आरोप त्यांनी केला. पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले की, आज शहरांचे नियोजन पूर्णपणे विस्कटले आहे. प्रचंड लोंढे येत आहेत. त्यांच्यासाठी पान २ वर

### केज- कळंब रस्त्यावर दि बार्निंग बसचा थरार !

#### जुन्या आणि नादुरस्त बसमधून प्रवाशी आणि चालक–वाहक करतात प्रवास !



कळंब । प्रतिनिधी

केज कडून कळंबकडे जाणारी प्रवाशांनी खचाखच भरलेली धावती बस ही केज कळंब रस्त्यावर अचानक पेटली. मात्र या अपघातात चालक आणि वाहकाच्या प्रसंगाधावनतेमुळे पुढील अनर्थ टळलेला आहे.

दि. ९ जून रोजी दुपारी ३.३० वा. च्या सुमारास कळंब आगाराची केज कळंब (एम एच– ११/बी एल– ९३७५) ही कळंब आगाराची एसटी बस केज कडून कळंबकडे जात असताना केज ते साळेगाव पान २ वर

### कोणी एकत्र येण्याने भाजपला आव्हान नाही–विखे पाटील

#### ठाकरे बंधुंच्या मनोमिलनावर विखेंची रोखठोक प्रतिक्रिया

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसापासून ठाकरे गट आणि मनसे एकत्र येणार असल्याच्या चर्चा असून भाजप हा दिड कोटी सदस्य असलेला जगातील सर्वात मोठा पक्ष आहे. त्यामुळे कोणी एकत्र येत असेल तर भाजपला त्याचे कसलेही आव्हान नसेल, असे मत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केले आहे.**



गेल्या काही दिवसांपासून मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चांना राजकीय वर्तुळात जोर मिळताना दिसत आहे. या चर्चांना सुरुवात झाली ती राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत केलेल्या सूचक वक्तव्यामुळे. त्यांच्या विधानानंतर पान २ वर

### मोदी सरकार उत्सवात आणि इकडे लोक रेल्वेतून पडून मेली!

#### मुंब्रा येथील घटनेवरून राहुल गांधी बरसले

मुंबई । प्रतिनिधी

दोन लोकल रेल्वे क्रॉस होत असताना धक्का लागून भयंकर घटना मुंब्रा रेल्वे स्थानकानजीक घडली. यात चार जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेबद्दल बोलताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी मोदी सरकारवर बरसले. मोदी सरकार सेवेचा आनंदोत्सव करत असताना पान २ वर

### दहशतवादी तहव्वुर राणाला तुरुंगातून नातेवाईकांशी फोनवरुन एकदा बोलता येणार

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

दिल्लीतील पतियाळा न्यायालयाने २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वुर राणाला त्यांच्या कुटुंबीयांशी फोनवरुन एकदा बोलण्याची परवानगी सोमवारी दिली. विशेष न्यायाधीश चंदरजीत सिंह यांनी राणाला ही परवानगी दिली. फोनवरील संवाद तुरुंग नियमावलीनुसार आणि तिहार तुरुंग अधिकाऱ्यांच्या पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०९ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६७.०० क्विंटल | २,३८६ | २,८२२ | २,५८३ |
| ज्वारी/हायब्रिड : ७६.५० क्विंटल | २,००० | ३,३४० | २,३९५ |
| मका/लोकल:२४.५०क्विंटल | २,०७५ | २,१९५ | २,१३५ |
| तूर : ४९.५० क्विंटल | ६,१७० | ६,४३१ | ६,३६५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी:१६६.५० क्विंटल | १,८८० | २,५७० | २,२७८ |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:५.५० क्विंटल | ४,१०० | ४,१०० | ४,१०० |
| हरभरा: २२.०० क्विंटल | ५,२४० | ५,३५० | ५,३०३ |

# ऊस पिकात एआय वापरासाठी हेक्टरी २५ हजार देणार!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची महत्वपुर्ण घोषणा

**पुणे । वृतसंस्था**

**ऊस पिकातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) वापरासाठी शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजार रुपये कर्ज देण्याची घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी (दि.९) केली आहे. परंतु कर्जाची वेळेत परतफेड केली नाही, तर १२ टक्के व्याज आकरण्यात येईल, अशी माहितीही उपमुख्यमंत्री पवारांनी दिली. ते वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.**

यावेळी अजित पवारांनी ठिबक उसासाठी १० हजार बिनव्याजी कर्ज देणार असल्याचेही सांगितले. ते म्हणाले, ऊस पिकातील कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी हेक्टरी २५ हजार रुपये देणार आहोत. त्यामध्ये ठिबकवर ऊस असेल तर कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी हेक्टरी १० हजार रुपये बिनव्याजी कर्ज देणार आहोत. असे पवार म्हणाले. राज्यातील ऊस शेतकऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी ६ टक्के व्याजदराने राज्य सहकारी बँक ५०० कोटी रुपये साखर कारखान्यांना देणार असल्याचे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी पान २ वर

### अर्थसंकल्पात ५०० कोटींची तरतूद

दरम्यान, ऊस शेतीत एआयला प्रोत्साहन देण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तसेच राज्य सरकारकडून कृषी क्षेत्रात एआयचा वापर करण्यासाठी धोरण निर्मिती सुरू आहे. अलीकडेच राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कृषी क्षेत्रात एआयचा वापर करण्यासाठी कर्जपुरवठा करण्याची माहिती दिली होती.



cmyk

अग्रलेख

# संशयकल्लोळ लोकशाहीला परवडणारा नाही

लोकसभेतील विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा एका लेखाच्या माध्यमातून देशातील निवडणूक यंत्रणेबाबत संशय व्यक्त केला आहे. या संशयाला उत्तर देताना निवडणूक आयोगाने आणि सरकारी यंत्रणांनीसुद्धा नेहमीच्याच पद्धतीने स्पष्टीकरण दिले आहे. राहुल गांधी यांनी आपल्या पूर्वीच्याच आरोपांची पुन्हा एकदा नव्याने मांडणी केली आहे आणि निवडणूक आयोगानेसुद्धा पूर्वीच्याच पद्धतीने नव्या आरोपांना उत्तर दिले आहे. साहजिकच देशातील निवडणूक यंत्रणेबाबत संशय निर्माण करणारा हा खेळ आणखी किती काळ चालू राहणार याबाबत विचार करावा लागेल.

देशात लवकरच बिहार आणि इतर काही राज्यांमध्ये विधानसभांच्या निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा हा विषय उपस्थित केला असला, तरी यापूर्वी निवडणूक आयोगाने काँग्रेसला अधिकृतपणे या प्रश्नांची उत्तरे पाठवली आहेत. आता राहुल गांधी यांच्या नवीन आरोपाप्रमाणे निवडणूक म्हणजे मॅच फिक्सिंगचा खेळ झाला आहे, विशेषतः महाराष्ट्रातील निवडणूक ही मॅच फिक्सिंग होती असेही त्यांनी म्हटले आहे. ज्या राज्यांमध्ये भाजपला पराभवाचा धोका वाटतो, त्या ठिकाणी अशा प्रकारे निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मॅच फिक्सिंगचा खेळ केला जातो असे त्यांना म्हणायचे आहे. पण वास्तव विचार करायचा झाला तर तेलंगणा आणि कर्नाटक या राज्यांमध्येसुद्धा भाजपाला पराभवाची भीती होती.पण तेथे पुन्हा एकदा काँग्रेसची सरकारे सत्तेवर आली आहेत.

निवडणूक यंत्रणांचा वापर करूनच निवडणूक जिंकायची असेल तर कोणत्याही निवडणुकीत १०० टक्के यश मिळवणे अशक्य नाही. अर्थात विरोधी पक्षांच्या युक्तिवादाप्रमाणे शंभर टक्के यश मिळाले तर जास्त संशय निर्माण होऊ शकतो म्हणूनच काही जागा विरोधी पक्षांना जिंकू दिल्या जातात. यावर निवडणूक आयोगाने वेगळ्या प्रकारे उत्तर दिले आहे. निवडणुकीत प्रतिकूल निकाल लागला की निवडणूक आयोगावर अशा प्रकारचे आरोप करण्याची सवय अनेकांना लागली आहे अशा आशयाचा आरोपवजा खुलासा निवडणूक आयोगाने केला आहे. निवडणुकीमध्ये शेवटच्या दोन तासांमध्ये संशयास्पदरित्या जास्त मतदान झाल्याचा जो आरोप केला जातो त्यालाही निवडणूक आयोगाने उत्तर दिले आहे.

राहुल गांधी यांनी निवडणूक यंत्रणेबाबत आरोप करणे आणि निवडणूक आयोगाने किंवा सत्ताधाऱ्यांनी त्याला उत्तरे देणे हा खेळ आता दीर्घकाळ खेळला जात आहे. पण हा खेळ थांबणार तरी कधी याचे उत्तर मात्र कोणाकडेही नाही. विरोधी पक्षांच्या मागणीप्रमाणे जरी मतपत्रिकांच्या माध्यमातून निवडणूक घेण्याचा प्रयोग झाला तरी तो संपूर्णपणे सुरक्षित असेल याची कोणतीही हमी देता येत नाही. कारण ज्या बिहार राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणूक होणार आहे त्याच राज्यामध्ये काही वर्षांपूर्वी मतपत्रिकांच्या माध्यमातून निवडणुका होत असताना मतपत्रिका पळवणे, बूथ ताब्यात घेणे आणि हिंसाचार करणे अशा अनेक गोष्टी घडत असत. आता ईव्हीएममुळे झालेल्या संशय कल्लोळाला जर पूर्णविराम द्यायचा असेल तर राहुल गांधी यांनी जे काही प्रश्न उपस्थित केले आहेत आणि ज्या मागण्या केल्या आहेत त्याची पूर्तता निवडणूक आयोगाने करायला हवी. भाजप केवळ निवडणूक यंत्रणेचा वापर करून आणि गैरवापर करून सत्तेवर येतो असा आरोप करतानाच मतदारांचाही एक प्रकारे अपमान केला जात आहे हे सुद्धा लक्षात घ्यावे लागेल.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीमध्ये लाडकी बहीण योजना आणि मतदारांचे ध्रुवीकरण या दोन गोष्टींचा परिणाम मोठ्या प्रमाणात झाला होता हे निवडणूक विश्लेषकांचेही मत आहे. दुसरीकडे लोकसभा निवडणुकीमध्ये अब की बार ४०० पारची घोषणा करणाऱ्या नरेंद्र मोदी यांच्या भाजपला २४० जागांवर समाधान मानावे लागले होते ही बाबसुद्धा विसरून चालणार नाही. जर ईव्हीएम किंवा निवडणूक यंत्रणा हाताशी धरून यश मिळवणे शक्य असते तर नरेंद्र मोदी सरकारला ४०० पार करणेसुद्धा काही अवघड नव्हते आणि काही पक्षांच्या कुबड्या घेण्याची गरज नव्हती. ही वास्तव परिस्थिती सुद्धा राहुल गांधी यांना लक्षात घ्यावी लागेल. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून गौरव होत असलेल्या भारतामध्ये निवडणूक यंत्रणेबाबत सातत्याने असा संशय निर्माण करणे कितपत योग्य आहे हेसुद्धा लक्षात घ्यावे लागणार आहे. प्रत्येक निवडणुकीनंतर किंवा प्रत्येक निवडणुकीपूर्वी अशा प्रकारे निवडणूक यंत्रणेबाबत संशय निर्माण होणे आपल्या लोकशाहीला परवडणारे नाही.

# आदर्श शिक्षक लक्ष्मण मळेकर यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

## बीड शहरातील ग्रँट यशोदा हॉटेलमध्ये देवराई ट्रेकिंग ग्रुपच्या अचूक नियोजनाखाली कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावणारे व शिक्षण क्षेत्रात प्रेरणास्त्रोत ठरलेले आदर्श शिक्षक लक्ष्मण मळेकर सर यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित गौरव सोहळा अत्यंत उत्साहात आणि सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. हा भव्य सोहळा बीड शहरातील ग्रँट यशोदा हॉटेलमध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाचे आयोजन देवराई ट्रेकिंग ग्रुपच्या अचूक नियोजनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परशुराम महाराज मराडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुधाकर शिंदे आणि घोडके साहेब उपस्थित होते. प्रारंभी संतोष पडुळे यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर लक्ष्मण मळेकर यांचा सपत्नीक सत्कार मान्यवरांच्या हस्ते



करून त्यांचा सेवा गौरव करण्यात आला. मळेकर सरांचे माजी विद्यार्थी व सहकारी शिक्षक यांनी आपल्या मनोगतातून सरांच्या प्रेरणादायी कार्याचा उल्लेख केला. प्रमुख पाहुण्यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त करत मळेकर सरांच्या शैक्षणिक वाटचालीचे कौतुक केले. लक्ष्मण मळेकर यांनी आपल्या शैक्षणिक कारकिर्दीचा सारगर्भ आढावा घेत सन्मानाला भावनिक शब्दांत उत्तर दिले. यावेळी त्यांनी आपल्या भावंडांचाभाऊ व बहिणींचाविशेष सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष परशुराम महाराज मराडे यांनी समारोप करत मळेकर सरांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. सूत्रसंचलन व जिजाऊ वंदना संतोष डोंगरे व श्रीकृष्ण उबाळे यांनी अत्यंत सुरेख पद्धतीने पार पाडले. या कार्यक्रमाला शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, मळेकर सरांचे सहकारी, मित्रपरिवार, माजी विद्यार्थी आणि इतर पाहुणे मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचा उत्साही आणि भावनिक माहोल उपस्थितांच्या मनात दीर्घकाळ ठसा उमटवणारा ठरला.

## राज्यात काल मुंबई शहर जिल्ह्यात सर्वाधिक ४१ मिमी पाऊस

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात मागील २४ तासांमध्ये (८ जून रोजी सकाळपर्यंत ) मुंबई शहर जिल्ह्यात सर्वाधिक ४१ मिमी पाऊस झाला आहे. तर रायगड २०.८ मिमी, धाराशिव १३.८ मिमी, ठाणे ७.९ मिमी, रत्नागिरी जिल्ह्यात ६.७ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

राज्यात कालपासून आज ८ जून रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) : ठाणे ७.९, रायगड ,२०.८, रत्नागिरी ६.७, सिंधुदुर्ग २, पालघर ०.९, नाशिक ३.५, धुळे १.९, नंदुरबार ०.३, जळगाव ०.९, अहिल्यानगर ५.७, पुणे ३.१, सोलापूर ३.८, सातारा ३.५, सांगली २.६, कोल्हापूर ३.१, छत्रपती संभाजीनगर ५, जालना ५.३, बीड १.२, लातूर ४.५, धाराशिव १३.८, नांदेड ०.७, परभणी २.९, हिंगोली ०.५, बुलढाणा ०.८, वाशिम ०.२, यवतमाळ ०.३, वर्धा ०.१. अतिवृष्टी आणि संभाव्य पूर परिस्थिती बाबत उपाय योजना म्हणून एनडीआरएफ, एसडीआरएफ पथकांना आपत्कालीन परिस्थितीकरिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात मुंबई-गोवा महामार्गावर निवळी घाटात एलपीजी गॅस टँकरची मिनीबसला धडक होऊन २९ जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. टँकरमधून गॅस गळती थांबवण्यासाठी जेएसडब्ल्यू टीम पोहचली असून गळती थांबवण्याचे काम सुरू आहे. रायगड जिल्ह्यातील एक व्यक्ती पाण्यात बुडून मृत झाली आहे. तर नाशिक जिल्हा वादळी पावसामुळे एक प्राणी, वीज पडून दोन प्राणी, धुळे व लातूर जिल्ह्यात वीज पडून प्रत्येकी दोन प्राणी आणि जळगाव जिल्ह्यात वीज पडून एक प्राणी मृत झालेले आहे. तसेच वादळी पावसामुळे जालना जिल्ह्यात दोन, जळगाव जिल्ह्यात वीज पडून एक आणि रत्नागिरी जिल्ह्यात रस्ता अपघात मध्ये २९ व्यक्ती आणि २ प्राणी जखमी झाली असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली.

# राज्यात प्राथमिक आरोग्य सेवांचे जाळे निर्माण करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस


**पुणे । प्रतिनिधी**

**प्राथमिक आरोग्यावर भर दिल्यास विशेषोपचार असलेल्या संदर्भ सेवांवरील ताण कमी होतो. त्यामुळे संपूर्ण राज्यात प्राथमिक आरोग्य सेवांचे जाळे निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. त्यादृष्टीने राज्यातील आरोग्य सेवेची पुर्नरचना करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, असे त्यांनी यावेळी नमूद केले.**

मावळ तालुक्यातील आंबी- तरंगवाडी येथे पुष्पलता डी. वाय. पाटील रुग्णालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, डी. वाय. पाटील विद्यापीठ, नवी मुंबईचे अध्यक्ष तथा कुलपती डॉ. विजय पाटील, डी. वाय. पाटील विद्यापीठ कोल्हापूरचे कुलपती संजय पाटील, डी. वाय. पाटील विद्यापीठ, नवी मुंबईच्या उपाध्यक्ष तथा उपकुलपती डॉ. शिवानी पाटील, माजी राज्यमंत्री संजय उर्फ बाळा भेगडे, उद्योजक रामदास काकडे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, राज्य शासनाच्या विविध योजना नीटपणे राबविण्याचे काम विद्यापीठाच्या माध्यमातून करण्यात येते. महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून ५ लाख रुपयांपर्यंत उपचार मोफत करण्यात येतात. आरोग्यसेवेच्या क्षेत्रात विमा आणि सेवेची खात्री या माध्यमातून गरीब रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत. राज्यात प्राथमिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्यासह द्वितीयस्तरीय आरोग्य सेवाही बळकट करण्यात येणार आहेत. विशेषोपचारासाठी शासकीय रुग्णालये, विद्यापीठांची आणि खाजगी रुग्णालये आहेत. आरोग्याच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याचा प्रयत्न आहे. गेल्या काही वर्षात १० वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात आले असून प्रत्येक जिल्ह्यात असे महाविद्यालय उभारण्यात येणार आहे. मुलींना वैद्यकीय शिक्षणाच्या शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णयही शासनाने घेतला. यातून शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विस्तार आणि गुणवत्ता दिसून येत आहे. विद्यापीठाने असेच कार्य सुरू करून नवनवीन ठिकाणी रुग्णालय आणि शैक्षणिक संकुल उभे करावे. त्यामागे समाजसेवेची भूमिका असल्याने शासनातर्फे सर्व सहकार्य करण्यात येईल. महाराष्ट्रात शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी क्रांती आणण्याचे आणि तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात संधी मिळवून देण्याचे काम करणाऱ्यांमध्ये डॉ. डी. वाय. पाटील हे एक अग्रणी नाव असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात उच्च शिक्षणाच्या खासगीकरणामुळे डॉ.डी.वाय.पाटील आणि त्यांच्यासारख्या व्यक्तींनी संस्था उभ्या केल्या आणि उच्च शिक्षणाचा विस्तार झाला. त्यामुळे अनेकांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. राज्यात सात खासगी विद्यापीठे या कुटुंबाने सुरू केली आणि गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम सुरू केले. गुणवत्तेला धक्का न लावता उत्तम शिक्षण देण्यासाठी डी.वाय.पाटील यांच्या कुटुंबाने चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. या वाटचालीत पुष्पलता पाटील यांचे संस्कार महत्वाचे ठरले असल्याने त्यांचे नाव रुग्णालयाला देण्यात आले आहे.

# विदर्भ, मराठवाड्यात पावसाचा अंदाज

## मॉन्सून गेल्या १३ दिवसांपासून एकाच भागात मुक्कामाला



**पुणे। पतिनिधी**

**मॉन्सूनने सोमवारीही प्रगती केली नाही. मात्र राज्यात काही ठिकाणी पावसासाठी पोषक हवामान झाले आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागात जोरदार पावसाचा अंदाज आहे. कोकण तसेच मध्य महाराष्ट्रातही काही ठिकाणी मुसळधारेचा अंदाज हवामान विभागाने दिला.**

राज्यात मॉन्सून गेल्या १२ दिवसांपासून एकाच भागात आहे. मॉन्सूनची सिमा मुंबई, अहिल्यानगर, अदिलाबाद, भवानीपटना, पुरी आणि बालूरघाट परिसरात कायम आहे. मॉन्सूनच्या प्रगतीसाठी पोषक हवामान नाही. त्यामुळे मॉन्सून एकाच भागात आहे. तर दुसरीकडे राज्यात पावसासाठी पोषक वातावरण आहे, त्यामुळे विदर्भ, मराठवाडा, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागात पावसाचा जोर काहीसा अधिक राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने पुढील ५ दिवस विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदीया, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील काही ठिकाणी हलक्या ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. अनेक भागात पावसाचा येलो अलर्टही देण्यात आला.

### मराठवाड्यात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज

मराठवाड्यातील परभणी, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यात पुढील ५ दिवस काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. तर छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातही काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील पुणे, अहिल्यानगर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदूरबार जिल्ह्यातही काही ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. कोकणातील सर्व जिल्ह्यांमध्येही काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचाही अंदाज हवामान विभागाने दिला.

# पान १ वरून...

### खरीप पेरणीला १४ जूनपर्यंत

हवामान विभागाने घटामाथा, पुणे, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, बीड, नांदेड, लातूर, धाराशीव आणि अहिल्यानगर यासहित १३ जिल्ह्यांत यलो अलर्ट जारी केला आहे. हवामान विभागाच्या म्हणण्यानुसार महाराष्ट्रातील काही भागांत ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

----------

### सरकार लक्षच देत नाही ; मुंबई रेल्वेसाठी

मोठे रस्ते, ब्रिज, मेट्रो बांधली जात आहेत. उंच उंच इमारतींना परवानगी दिली जात आहे, पण पार्किंगचे काहीही नियोजन नाही. प्रत्येक शहरात ट्रॅफिकची गंभीर समस्या आहे. नवनवीन रस्ते, मेट्रो बांधून काहीही फरक पडत नाही, तरीही कुठलेच सरकार शहर नियोजनाचा किंवा बाहेरून येणाऱ्या लोंढ्यांचा विचार करत नाही. आपले सगळे लक्ष फक्त निवडणुका आणि प्रचार यावरच केंद्रित असल्याची टीका त्यांनी केली.

--------------

### हरियाणा, महाराष्ट्राच्या मतदारयादीच

२००९ ते २०२४ पर्यंत हरियाणा आणि महाराष्ट्राची मतदार यादी शेअर करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. काँग्रेससह अनेक विरोधी पक्ष बऱ्याच काळापासून अशी मागणी करत आहेत की मतदार यादी केवळ स्कॅन किंवा पीडीएफ स्वरूपातच नाही तर अशा डेटा स्वरूपात (जसे की एक्सेल, सीएसव्ही इ.) उपलब्ध करून दिली पाहिजे ज्यामुळे तिचे विश्लेषण करणे, अनियमितता ओळखणे आणि पारदर्शकता सुनिश्चित करणे शक्य होईल. निवडणूक आयोगाने मान्य केले आहे की ते राजकीय पक्षांसोबत मतदार याद्या सामायिक करण्याच्या प्रक्रियेत आहेत, परंतु अद्याप कोणतीही अंतिम वेळ किंवा डेटा स्वरूप स्पष्टपणे जाहीर केलेले नाही.

----------

### कोणी एकत्र येण्याने भाजपला

मनसे आणि ठाकरे गटातील युतीबाबत चर्चांना उधाण आले. यानंतर उद्धव ठाकरे यांनी देखील राज ठाकरे यांच्या वक्तव्याला प्रतिसाद दिला होता. अलीकडेच माध्यमांशी बोलताना उद्धव ठाकरे यांनी जे जनतेच्या मनात आहे, तेच होईल. आता थेट बातमीच देऊ,असे म्हटले होते. त्यांच्या या विधानामुळे शिवसेना ठाकरे गट आणि मनसे युतीच्या शक्यतेला आणखी बळ मिळाले आहे. आता यावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मोठे वक्तव्य केले आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधताना विविध मुद्द्यांवर भाष्य केले आहे. यावेळी मागील काही दिवसांपासून शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि मनसे एकत्र येणार, अशा चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. याबाबत भाजपला काही आव्हान वाटते का? असा प्रश्न विचारला असता राधाकृष्ण विखे यांनी म्हटले की, दीड कोटी सदस्य संख्या असलेला भाजप हा जगातील सर्वात मोठा पक्ष आहे. कोणी एकत्र येण्याने आव्हान निर्माण होते असे कोणी म्हणत असेल तर तो कल्पना विलास आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

----------

### केज- कळंब रस्त्यावर दि

दरम्यान चिंचोली पाटी जवळ असलेल्या शेख फरीद बाबा दर्ग्या जवळ या बसच्या ड्रायव्हर केबिन बॉनेटने अचानक पेट घेतला. अचानक पेट घेतल्याने प्रसंगावधान राखून एसटी बस चालक अनिल बारकुल आणि वाहक भांगे यांनी बस रस्त्याच्या बाजूला घेतली. तोपर्यंत प्रचंड आग भडकलेली होती. परंतु चालक आणि वाहक यांनी प्रसंगावधान राखल्याने त्यांनी प्रवाशांना सुखरूप खाली उतरविले. यामुळे पुढील अनर्थ टळला आहे. त्यानंतर अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी हजर झाली परंतु तो पर्यंत पूर्ण एसटी ही जळून भस्मात झालेली होती. या अपघातात तीन ते चार प्रवासी हे किरकोळ जखमी झालेले आहेत.

**चालक-वाहक यांचे कौतुक**

गाडीमध्ये प्रचंड धूर आणि आगीच्या ज्वाळा भडकत असताना चालक अनिल बारकुल आणि वाहक भांगे यांनी स्वतः घाबरून न जाता गाडी रस्त्याच्या कडेला सुरक्षितपणे घेऊन दरवाजे उघडले आणि प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. अन्यथा जर चालक आणि वाहक गोंधळून गेले असते तर या गर्दीच्या महामार्गावर अपघात घडून जीवित हानी झाली असती.

**घटनास्थळी माहिती मिळताच आग विझविणारे दोन बंब दाखल**

या आगीची माहिती प्रकरणी तहसीलदार राकेश गिड्डे आणि पोलिस यांना देताच त्यांनी केज आणि कळंब येथील अग्नीशामक दलाची संपर्क साधला आणि त्या नंतर केज येथील दोन्ही अग्निशामक दलाचे बंब अपघात स्थळी पोहोचले परंतु कळंब येथील बंब येण्यापूर्वीच केज येथील अग्नीशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी आग विझविली.

**पोलिस आणि गावकरी सुद्धा मदतीला धावून आले**

बस पेटल्याची माहिती मिळताच पोलीस हेडकॉन्स्टेबल बाळासाहेब अहंकारे, शहादेव मेहेत्रे, गुप्त वार्ता विभागाचे शिवाजी कागदे आणि पोलिस निरीक्षक यांचे लेखनिक संतोष देशमुख हे घटनास्थळी हजर झाले. तसेच यावेळी गावकरी देखील उपस्थित होते. त्यांनीही आग विझविण्यासाठी मदत केली.

**नादुरुस्त आणि भंगार बसमुळे प्रवाशांना जीव धोक्यात घालून करावा लागतोय प्रवास**

एस टी महामंडळाच्या बस खिळखिळ्या आणि नादुरुस्त झालेल्या आहेत. दर दोन दिवसांनी या मार्गावर बस बंद पडत असतात. तसेच बस मधून प्रचंड धूर ओकतात मात्र सामान्य आणि वृद्ध प्रवाशांना असल्या धोकेदायक बसमधून असुरक्षितपणे प्रवास करावा लागत आहे. या अपघातामुळे उपस्थित लोक आणि प्रवाशी यांनी माध्यमांशी बोलताना प्रचंड रोष व्यक्त केला.

-------------

### दहशतवादी तहव्वुर राणाला तुरुंगातून

देखरेखीखाली असेल, असे न्यायाधीशांनी सांगितले. न्यायालयाने सोमवारपासून १० दिवसांच्या आत दहशतवादी राणाच्या प्रकृतीबाबत नवीन अहवाल मागितला आहे. राणाला नियमित फोन कॉल करण्याची परवानगी द्यावी की नाही यावर तुरुंग अधिकाऱ्यांकडून त्यांची भूमिका स्पष्ट करणारा अहवालही न्यायाधीशांनी सादर करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, दहशतवादी तहव्वूर राणा सध्या तिहार तुरुंगात आहे. मुंबई दहशतवादी हल्ल्याप्रकरणी न्यायालयाने त्याला ९ जुलैपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. दरम्यान, २४ एप्रिल २०२५ रोजी दहशतवादी तहव्वूर राणाची नातेवाईकांशी फोनवरुन बोलण्याची मागणी न्यायालयाने फेटाळून लावली होती. एनआयएने त्याच्या मागणीला विरोध केला होता. त्यानंतर त्याने पुन्हा अर्ज सादर केल्यानंतर आता परवानगी मिळाली आहे.

-----------

### मोदी सरकार उत्सवात आणि

देशातील सत्य परिस्थिती मुंबईतून येत आहे. लोक रेल्वेतून पडून मेले आहेत, असे ते म्हणाले. मुंब्रा रेल्वे स्थानकावरील घटनेवरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारला धारेवर धरले. राहुल गांधी म्हणाले, मोदी सरकार ११ वर्षातील सेवेचा उत्सव साजरा करत असताना देशातील परिस्थिती मुंबईतून येत असलेल्या दुःखद घटनेमध्ये दिसत आहे. रेल्वेमधून पडून अनेक लोकांचा मृत्यू झाला आहे. भारतीय रेल्वे कोट्यावधी जिवांचा कणा आहे. पण, आज असुरक्षा, गर्दी आणि विस्कळीतपणाचे प्रतीक बनली आहे. मोदी सरकारचे ११ वर्षे ना उत्तरदायित्व आणि ना बदल, फक्त प्रचार अशी आहेत, अशी टीका राहुल गांधी यांनी केली. सरकारने २०२५ बद्दल बोलणे सोडून दिले आहे, आता २०४७ ची स्वप्न विकत आहे. मी मृतांच्या कुटुंबीयांप्रति सहवेदना व्यक्त करतो आणि जखमींची प्रकृती लवकर बरी व्हावी, अशी प्रार्थना करतो, असे राहुल गांधी म्हणाले.

-------------

### ऊस पिकात एआय वापरासाठी

यावळी सांगितले. या निधीचा वापर कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी वापरावा अन्यथा कारखान्यांवर कारवाई करण्यात येईल, अशी तंबी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली. तसेच कृषी विद्यापीठांनी शंभर एकरवर ऊस बेणे प्लॉट एआयवर करण्यासाठी प्रोत्साहन देण्याची सूचना अजित पवारांनी यावेळी केली. तर राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी एआयसाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्याचा शासन निर्णय लगेच काढणार असल्याचे सांगितले.

----------

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. १० जून २०२५



## नवनियुक्त कळंब शहर भाजपा अध्यक्ष पाटील यांचा पत्रकारांच्या वतीने सत्कार

**कळंब । प्रतिनिधी**

धाराशिव भाजपाचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष दत्ता (भाऊ) कुलकर्णी यांनी कळंब तालुका कार्यकारणी नुकतीच जाहीर केली त्यामध्ये कळंब शहर भाजपा अध्यक्षपदी मकरंद पाटील यांची नियुक्ती करण्यात आली त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे पाटील यांच्या निवडीबद्दल कळंब तालुका पत्रकार संघाचे मा.अध्यक्ष परमेश्वर पालकर कळंब तालुका मराठी पत्रकार मंडळाचे अध्यक्ष धनंजय घोगरे यांनी सत्कार केला यावेळी कळंब तालुका भाजपा सरचिटणीस संजय जाधवर,पत्रकार प्रवीण तांबडे,परशुराम देशमाने आदी उपस्थित होते.



# सेवा सहयोग फाउंडेशन हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणार

**बीड । प्रतिनिधी**

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत करणाया सेवा सहयोग संस्थेच्या विद्यार्थी विकास योजनेतून गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती स्वरूपात मदत दिली जाते. दहावीमध्ये ९० टक्के, बारावीत ७० टक्के आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेत चांगल्या दर्जाच्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळतील इतके गुण मिळवणारे गरजू विद्यार्थी या योजनेत मदत मिळण्यास पात्र ठरतात. संबंधित विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी संस्थेच्या जिल्हानिहाय कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. संपर्क यादीची लिंक खाली दिली आहे.**

सेवा सहयोग संस्थेच्या विद्यार्थी विकास योजनेच्या कार्याचा परिघ दिवसेंदिवस विस्तारत आहे. ठाण्यात सुरू झालेल्या या उपक्रमातून गेल्या १७ वर्षात ३६ जिल्ह्यातील २ हजार ३९६ विद्यार्थ्यांना २७ कोटी ३१ लाख रूपये शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात आले. २०२४-२५ या आर्थिक वर्षात १ हजार ३१ विद्यार्थ्यांना संस्थेने ६ कोटी २५ लाख रूपये शिक्षणासाठी मदत केली. या १४ वर्षात संस्थेने ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील आठ शाळा इमारतीच्या पुनर्निर्माणासाठी ७ कोटी ५९ लाख रूपये उपलब्ध करून दिले आहेत. समाजातील नव्या पिढीतील गुणवत्तेला न्याय देण्याचा प्रयत्न करणाया या उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे संस्थापक रविंद्र कर्वे यांनी केले आहे. महाराष्ट्रासह उत्तरप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, गुजरात, केरळ, छत्तीसगड, मध्यप्रदेश, राजस्थान आणि झारखंड या राज्यात ही शैक्षणिक चळवळ पोहोचली आहे. टीजेएसबी बँकेचे सीईओपदावरून निवृत्त झाल्यावर रविंद्र कर्वे यांनी समविचारी मित्रांसह ठाण्यात २००८ मध्ये विद्यार्थी विकास योजना संस्थेची स्थापना केली. वर्षागणिक संस्थेची व्याप्ती वाढत आहे. ६२३ देणगीदार आणि ५०० शुभचिंतकांच्या सहकार्याने संस्थेचे कार्य सुरू असून या उपक्रमाद्वारे मार्च अखेरपर्यंत ३४ कोटी ९० लाख रूपयांचा निधी शैक्षणिक कार्यासाठी संकलीत झाला आहे. संस्थेच्या मदतीने शिक्षण पूर्ण करून नोकरी लागलेल्या माजी विद्यार्थ्यांनी बांधिलकी मानून आतापर्यंत ६३ लाख ५७ हजार रूपये संस्थेकडे सुपूर्द केले आहेत. संस्थेच्या एकुण निधी संकलनात माजी विद्यार्थ्यांचे सध्याचे योगदान दोन टक्के असले तरी ते भविष्यात वाढत जाणार आहे.

संस्थेची ठळक वैशिष्ट्ये

गुणवत्ता आणि गरज हे संस्थेतर्फे दिल्या जाणाया मदतीचे निकष असून त्याचे काटेकोरपणे पालन केले जाते.

संस्थेकडून मदत मिळालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ५४ टक्के मुले आणि ४६ टक्के मुली आहेत.

संस्थेकडून शिष्यवृत्ती मिळविलेले ४३ टक्के विद्यार्थी शहरी, २० टक्के विद्यार्थी अर्धनागरी भागातून तर ३७ टक्के विद्यार्थी ग्रामीण परिसरातील आहेत. अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न साकार गरीब घरातील विद्यार्थी कितीही हुशार असला तरी पैशाअभावी क्षमता असूनही त्याला इंजिनियर अथवा डॉक्टर होता येत नव्हते. आता ही परिस्थिती बदलली आहे. संस्थेने मदत केलेल्या एकुण विद्यार्थ्यांपैकी ४० टक्के विद्यार्थी देशभरातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयातून इंजिनियरिंगचे शिक्षण घेत आहेत. २४ टक्के विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात संस्थेचे विद्यार्थी आहेत. दहा टक्के नर्सिंग आणि पॅरामेडिकल, सात टक्के पदवी तर पाच टक्के विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत. आर्किटेक्चर, फॅशन डिझायनिंग, फार्मसी, आयसीडब्यूए, सीए, सीएस या अभ्यासक्रमांसाठीही विद्यार्थ्यांना संस्थेने शिष्यवृत्ती दिली आहे. आतापर्यंत संस्थेच्या मदतीने १३६४ विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाले. एक हजार ३२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे विद्यार्थी नामांकित कंपन्यांमध्ये संस्थेच्या मदतीने उच्च शिक्षण घेतलेले २६ माजी विद्यार्थी टाटा समूहातील कंपन्यांमध्ये नोकरी करीत आहेत. इन्फोसिस आणि महिंद्रा अँन्ड महिंद्रामध्ये प्रत्येकी ११, एल अँन्ड टीमध्ये सहा, कॅपजेमिनी मध्ये पाच तसेच टीजेएसबी बँक, सिप्ला, एचएसबीसी, आयसीआयसीआय आदी नामांकित कंपन्यांमध्ये संस्थेचे विद्यार्थी अधिकारीपदावर आहेत. आतापर्यंत एकुण ४८५ विद्यार्थी विविध आस्थापनांमध्ये नोकरीला लागले आहेत.

## संत गजानन महाराज मंदीरात श्रीराम पंचायतन मुर्तीची स्थापना

**तीन दिवस धार्मिक कार्यक्रमांत भाविकांची उपस्थिती**

बीड । प्रतिनिधी



शहरातील सहयोगनगर येथील श्री संत गजानन महाराज मंदीरांचा जीर्णोद्धार करण्यात येवून मे महिन्यात गणनायक, गणेशा, गुरूनायक श्री दत्त प्रभु, मुर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती. तर जून महिन्यात श्रीराम पंचायतन म्हणजे श्रीराम, लक्ष्मण, सीता, हनुमान, आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या मुर्तीची दि. ६ ते ८ जून दरम्यान धार्मिक कार्यक्रमातून मुर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

शहरातील अनेक भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री संत गजानन महाराज मंदीराचा गेल्या काही दिवसांपासून कायापालक करण्यात आला आहे. मंदीरामध्ये भाविकांच्या सहभागातून नव्याने बांधकाम करण्यात आले असून या ठिकाणी विविध देवदेवतांच्या मुर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली आहे. मे महिन्यांत तीन दिवस धार्मिक कार्यक्र म घेवून गणेशासह दत्तप्रभुंची आकर्षक आणि भव्य मुर्तीची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर जून महिन्यातही तीन दिवस धार्मिक कार्यक्र म घेवून श्रीराम पंचायतन मुर्तीची प्रतिष्ठपणा करण्यात आली. मकराना मार्बलमध्ये कोरलेल्या प्रभु श्रीराम सीता, लक्ष्मण, उजव्या बाजुस मी दास असे अभिमानाने दर्शवणारे मारूतीरायांची मुर्ती स्थानपन्न झालेली आहे. तर डाव्या बाजून कलियुगातील श्रीरामाचे दास समर्थ रामदास स्वामी यांची आकर्षक अशी मुर्ती स्थापन करण्यात आली आहे. भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत श्री गजानन महाराज मंदीर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## उपळीत पोलिसांचा छापा, ४०० किलो मांस जप्त करून आरोपीस अटक

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील उपळी येथे वडवणी पोलिसांनी छापा मारून जवळपास ४०० किलो वंशाचे जप्त करून एका आरोपीला अटक केली आहे

दिनांक ०८/०६/२०२५ रोजी दुपारी वडवणी पोलीस ठाणे हद्दीमध्ये उपळी या गावात एक इसम गोवंश जातीचे जनावरांची कत्तल करीत असल्याची गोपनीय माहिती वडवणी प्रभारी वर्षा व्हगाडे यांना मिळाली. त्यांनी तात्काळ मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी छापा मारला असता तेथे फिरोज सिकंदर कुरेशी वय ३५ वर्ष, राहणार उपळी हा त्याचे घरामध्ये गोवंश जातीची जनावरे कत्तल करताना मिळून आला. पोलिसांनी घटनास्थळावरून ८० हजार रुपये किमतीचे ४०० किलो वजनाचे गोवंश जनावरांचे मांस, लोखंडी सुरे व लाकडी ओंडका जप्त केला. सध्या आरोपी अटकेत असून पुढील तपास सहाय्यक फौजदार विष्णू जायभाये करत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे, पोलीस उपनिरीक्षक राजू राठोड, संदीप चव्हाण, पोलीस अंमलदार विष्णू खरात, किरण इरमले, वसंत करे यांनी केली

# माऊली दादांनी लोकोद्धाराचे काम केले - प्रकाश महाराज बोधले

**सारणी । प्रतिनिधी**

**विसाव्या शतकातील महान संत विभुती ज्ञानेश्वर दादा माऊली यांनी लोकोद्धाराचे काम केले. त्यामुळे आज श्रीक्षेत्र चाकरवाडीत मिनी कुंभ मेळा भरला आहे. संतांच्या आशीर्वादांची शिदोरी आयुष्यभर सरत नाही असे प्रतिपादन प्रकाश महाराज बोधले यांनी केले. दुसऱ्या दिवसाचे (दि. ०८ जून) कीर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते.**

यावेळी प्रमुख उपस्थिती महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, महंत महादेव महाराज चाकरवाडीकर, श्री ह भ प नारायण भाऊ उत्तरेश्वर पिंपरीकर, श्री ह भ प रामकृष्ण रंधवे बापू , श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, श्री ह भ प गणेश महाराज जोगदंड, श्री ह भ प हरिदास भाऊ जोगदंड, शिवानंद महाराज गिरी यांच्यासह हजारो भावी फक्त उपस्थित होते.

श्रीक्षेत्र चाकरवाडी (जि.बीड) येथे विसाव्या शतकातील महान संत विभूती ज्ञानेश्वर दादा माऊली यांच्या रौप्य महोत्सवी पुण्यतिथी उत्सवात दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प प्रकाश महाराज बोधले यांनी वाहिले. यावेळी संत तुकाराम महाराज यांच्या

तुमचिये दासींचा दास करूनि ठेवा । आशीर्वाद द्यावा हाचि मज ।।१।।

नवविधा काय बोलली जी भक्ती । घ्यावी माझ्या हातीं संतजनीं ।।२।।

तुका म्हणे तुमच्या पायांच्या आधारें । उत्तरेन खरें भवनदी ।।३।।



या अभंगावर चिंतन मांडले यावेळी पुढे बोलताना महाराज म्हणाले की मराठवाड्यामध्ये वारकरी संप्रदाय प्रचार प्रसाराचे काम दादा माऊलींनी मोठ्या प्रमाणात केली त्यांनी संपूर्ण आयुष्य जनसामान्यांच्या उद्धारासाठी खर्च केले. त्यामुळेच आज हा वैभवशाली सोहळा होत आहे.

जगातील प्रत्येक माणूस स्वार्थी त्यागी माणूस आजपर्यंत जन्माला आलेला नाही. संतही मागतात देवही मागतो आणि जीवही मागतो. प्रत्येकाची मागणी वेगळी असते. नको ब्रम्ह ज्ञान आत्मस्थिती भाव... साधू भक्ती प्रेम मागतात. परमार्थ चांगला सुरू असेल तर देव संसारातील काही तरी गोष्ट अनुकूल करतो जीव त्यात अडकतो या अभंगात संताकडे आशीर्वाद मागतात. राजाकडे वैभव मागावे. संताकडे आशीर्वाद मागावा. आशीर्वादामध्ये खूप मोठी ताकद असते. प्रतिज्ञा ही शक्ती ने केली जाते. आशीर्वाद हा देणाऱ्यांच्या अंतकरणाच्या समाधानाचा भाव असतो.. या अभंगांमध्ये जगद्गुरु तुकाराम महाराज संतांच्या दाशीचा तास करण्याची मागणी करतात. भक्ती काय आहे ही संतांनीच सांगितली पाहिजे. कारण संत अनुभवाला आणून देतात. आपल्याला भक्ती कशी करवी हे माऊलींच्या पुण्यतिथी उत्सवात कळते. संतांच्या पायाच्या आधारानेच भव नदी तरुण जाता येते असे महाराज म्हणाले.किर्तनात साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंग वादक राम महाराज काजळे, गायनाचार्य बिबीशन महाराज कोकाटे ओंकार महाराज जगताप ,अभिमान महाराज ढाकणे, विष्णु महाराज, संजय महाराज देवकर, माऊली महाराज आवटे यांच्यासह शेकडो टाळकरी मंडळी उपस्थित होते.

## वर्षभरात आई-वडिलांचे छत्र हरपले रोजेकर भावंडांला आर्थिक मदतीसाठी ग्रामस्थ सरसावले



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

जेमतेम सहा महिन्यांपूर्वी दुर्धर आजाराने आईचे निधन झाले.अपघातात वडिलांचे अकाली निधन झाले.पोरके झालेले रोजेकर शाळकरी भावंडांना आर्थिक मदतीसाठी चाटगांव ग्रामस्थांनी पुढे येत आर्थिक आधार दिला.

चाटगांव येथील दुचाकीस्वार बाबासाहेब वैजनाथ रोजेकर याचे बीड परळी महामार्गावर दिंद्रुड जवळ गुरुवारी (दि.५) रोजी अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला.या अपघातात बाबासाहेब याचा मुलगा गणेश (वय १४)वर्ष हा गंभीर जखमी असून त्याच्यावर बीड येथील खाजगी रुग्णालयात उपचार चालू आहेत. बाबासाहेब रोजेकर याची पत्नी अनिताचे ६ महिन्यांपूर्वी किडनीच्या दुर्धर आजाराने निधन झाले. शाळकरी मुले गणेश व वैभव या दोघांचाही आधार हिरावला गेला आहे. बाबासाहेब रोजेकर हा बांधकाम कामगार होता घरची आर्थिक परिस्थिती हालाखीची वैभवने इयत्ता दहावीची परीक्षा दिली आहे तर गणेशने इयत्ता आठवीत शिक्षण घेत आहे. घरात वयोवृद्ध आजी असून आता जगायचे कसे हाच प्रश्न या रोजेकर भावंडासमोर आहे. याचे दखल चाटगावकर ग्रामस्थांनी घेतली, रविवारी सकाळी गावात आर्थिक मदत फेरी काढत ६० हजार रुपये जमा केले. आर्थिक मदत संभव नसणाऱ्यांनी अन्नधान्य दिले. येथील जिल्हा परिषद शिक्षक मुंडे यांनी दोन्ही भावंडाची शैक्षणिक जबाबदारी घेतली. चाटगावकर ग्रामस्थांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पद्माकर सेलमोकर यांची निवड

### ब्राम्हणसभा अंबाजोगाई शहर(उत्तर विभाग) उपाध्यक्ष पदाची जवाबदारी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील ब्राम्हणसभेचे जेष्ठ कार्यकर्ते पद्माकर सेलमोकर यांची ब्राम्हण सभेच्या अंबाजोगाई शहर(उत्तर विभाग) उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पद्माकर दत्तात्रय सेलमोकर हे रोटरी क्लब,जेष्ठ नागरिक संघ यासह शहरात होणाऱ्या सर्व सामाजिक,धार्मिक कार्यक्रमात मोठ्या हिरीरीने सहभाग घेतात सेलमोकर यांनी तळागाळातील दुर्लक्षित,कष्टकरी जन सामान्यांसाठी कार्य केले आहे व आजही हे कार्य चालुच आहे. ब्राम्हण सभेने घेतलेल्या उपनयन संस्कार सोहळ्यातील विविध जबाबदाऱ्या त्यांनी मोठ्या हिमतीने पार पाडल्या सर्वांविषयी स्नेहभाव,आपूलकी जोपासून त्यांचे कार्य नेहमी सुरू असते.**



त्यांची मुले मोठ्या पदावर कार्यरत आहेत सेलमोकर हे बहुसंख्येने ब्राम्हण समाज राहतो त्या उत्तर विभागासाठी पद्माकर सेलमोकर यांची निवड ब्राम्हण सभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर यांनी केली आहे.

सेलमोकर यांच्या निवडीने उत्तर विभागासाठी एक खंबीर व अनुभवी व्यक्तीची निवड झाल्याचे ब्राम्हण सभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर यांनी म्हटले आहे. ब्राम्हण सभा अंबाजोगाईच्या उपाध्यक्षपदी आपली निवड झाल्याने माझ्यावर मोठी जबाबदारी आल्याचे सेलमोकर यांनी म्हटले आहे. सेलमोकर यांच्या निवडीबद्दल ब्राम्हणसभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर, कोषाध्यक्ष सुधाकर विडेकर,महिला उपाध्यक्षा ॲड. कल्याणी विर्धे,आरती सोनेसांगवीकर,पत्रकार राहूल देशपांडे,अविनाश मुडेगांवकर,मुकूंद घाटे सचिन भातलवंडे,श्रीपाद चिक्षे प्रभाकर सेलमोकर, ॲड. जयदीप विर्धे,प्रभंजन वांजरखेडकर, मुन्ना सांगवीकर, डी.टी.वामन, विशाल जहागीरदार,किरण सेलमोकर,प्रणिता सेलमोकर,सविता देशमुख यांच्यासह इतरांनी अभिनंदन केले आहे.

## पान ६ वरून...

### डॉ.योगेश क्षीरसागर

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कथा श्रवण केली. यावेळी डॉ.क्षीरसागर यांच्यासह भाजपचे नेते नंदकिशोर मुंदडा, डॉ.दिपाताई क्षीरसागर, संतोष सोहनी, शुभम धूत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने भाविकांमध्ये भक्तिभावाचे वातावरण असून, परिसरात अध्यात्मिक ऊर्जा अनुभवता येत आहे.

### अर्पिता मुंडेची इस्त्रो

उपाध्यक्ष महेश शेटे, कोषाध्यक्ष एस.जी.स्वामी, सहसचिव आर.आर.पाटील, प्राचार्य दि.ना.फड मुअ श्रीमती एस.के.जाधव, पर्यवेक्षक कृष्णा देशमुख, पर्यवेक्षिका श्रीमती एस.एस.नखाते यांच्यासह शिक्षकवृंदांनी तीचे अभिनंदन केले आहे.

### शिवकृपेसाठी माऊली दादा

केल्याने अशक्य ते शक्य होते. त्यामुळे महादेवासारख्या दयाळू देवावर भक्ती करा. माऊली दादांनी महादेवावर भक्ती केली, नामस्मरण केले आणि आपले आयुष्य सुखी समाधानी केले. दुःख पासून मुक्ती मिळविण्यासाठी माऊली दादांसारखी भक्ती करावी असे आवाहन ही शिवमहापुराण कथेत परम पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांनी शिवमहापुराण कथेत केले.दरम्यान बीड जिल्ह्याच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले माऊली दादाची चाकरवाडी नागरी नामस्मरनाणे दुमदुमली महापूजा, काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, शिवमहापुराण कथा, हरिपाठ, शिव सहस्रनाम, विष्णू सहस्रनाम, अभंगवाणी संगीत भजन, संकीर्तन, भारुड हरिजागर या चोवीस तासांत हरिनाम नामस्मरणाने माऊली दादाची चाकरवाडी दुमदुमली असून भाविकांचा ओघ वाढत आहे. या कथेस लाखो भाविकांची उपस्थिती होती. विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या पंचविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळा तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली चाकरवाडी येथे विविध कार्यक्रम नियोजनाप्रमाणे पार पडत आहे. तरी भाविकांनी या कथेचा अखंड नाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### शेतकऱ्यांची कर्जमाफी करुन

जाधव होते कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून पक्षाचे सहचिटणीस भाई बाबासाहेब देवकर, महिला आघाडीच्या ॲड मानसी म्हात्रे ,भाई बाबुरावजी लागारे ,चित्रलेखा गोळेगावकर नारायण गोले पाटील, भाई उदय गवारे, विष्णुपंत घोलप, ॲड गोविंद डुमणे, बाळासाहेब धस यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी, तुषार गोळेगावर ,किरण खपले, अमोल दिक्षीत, उत्तम अमृतराव, सुशिल सोमवंशी, राजाराम रसाळ, आसद बल्खी, शिवाजी सुरवसे, राजु सुरनर, यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेळावा समन्वयक भाई मोहन गुंड यांनी केले, सुत्रसंचलन हनुमंत घाडगे सर यांनी केले. तर आभार प्रा उमाकांत राठोड यांनी केले. अशोक रोडे ॲड निखिल बचुटे मुंजा पांचाळ मंगेश देशमुख यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

### आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेसाठी

पहिली वेस्टर्न डान्स अकॅडमी आहे. अकॅडमी सुरू केली तेव्हा अंबाजोगाईकरांनी आमच्यावर प्रेम व्यक्त करीत, विश्वास ठेवून भरभरून प्रतिसाद दिला. अंबाजोगाई मध्ये कलेची आणि योग्य कलावंतांची कदर करणारा एक मोठा वर्ग आहे. त्यामुळे मला काम करताना खूप लोकांनी मदत केली आहे. ग्रामीण भाग असल्याने अकॅडमीच्या सुरूवातीच्या काळात अनेक अडचणीं ही आल्या पण, योग्य नियोजन, साफ नितिमत्ता, माझी कलेवरील निष्ठा आणि प्रेम या गोष्टींच्या बळावर, सर्वांच्या सदिच्छा व आशिर्वाद यांच्या आधारावर आज अंबाजोगाई मध्ये तब्बल १७ वर्षांचा प्रवास आम्ही यशस्वीरित्या पूर्ण करीत आहोत याचे आनंद व समाधान आहे. पुढील काळात ही नृत्य, सांस्कृतिक, नाट्य या क्षेत्रात अंबाजोगाईकरांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी ग्रामीण भागातील नवप्रतिभांना नवकेशरच्या माध्यमातून एक दर्जेदार व सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आश्वासक मनोदय नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमीचे प्रमुख भिमाशंकर शिंदे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केला.

### पाटोद्यात प्रा.आ.केंद्रात

२०२४ ते मार्च २०२५ पर्यंत १८०१ गरोदर मातांची नोंदणी झाली असून. वर्षभरात वहालीत.एकही डिलिव्हरी नाही . नायगाव .३१ . डोंगर किन्ही.२३.अमळनेर ३८ झाल्या असून १५५२ डिलिव्हरी ह्या खाजगी दवाखान्यात व इतर ठिकाणी रेफरमुळे केल्या आहेत.याकडे मात्र तालुका आरोग्य अधिकारी व संबंधित वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांचे सततची गैरहजेरी व दुर्लक्षपणामुळे बाळंतपणासाठी आलेल्या महिलांना या ठिकाणी संबंधित वेळेत डॉक्टर व संबंधित कर्मचारी न भेटल्यामुळे खाजगी रुग्णालयाचा आधार घ्यावा लागत असून तर या ठिकाणी बहुतांशी महिला बाळंतपणासाठी आल्या तर या ठिकाणी कर्मचारी हे उडवाउडवीची उत्तरे देऊन संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रातून इतर ठिकाणी रेफर करत असून तरी इतर ठिकाणी रेफर करणारे अधिकारी कर्मचाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ गंडाळ यांच्याकडे करण्यात येत असून मात्र याकडे आरोग्य विभाग जाणून दुर्लक्ष करत असून यामुळे सर्वसामान्य गरीब असणाऱ्या कुटुंबाला आर्थिक फटका बसत असून शासनाच्या नियमानुसार डिलिव्हरी शासकीय रुग्णालयात करण्यासाठी एकिकडे शासन मदत देत आहे मात्र पाटोद्यात आरोग्य विभागावर वचक नसल्याने गोरगरीबाचे हाल होत आहे तरी याकडे जिल्हाधिकारी बीड व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे

cmyk

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
मंगळवार, दि. १० जुन २०२५


# सिंचन, कापूस दराअभावी शेतकरी आत्महत्या-नितीन गडकरी

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात विदर्भ पाणी परिषद

नागपूर : शेतकरी आत्महत्या मागील कारणांचा वेध घेण्याकरिता अनेक अभ्यास समित्यांची स्थापना झाली. परंतु माझ्या मते सिंचनाचा अभाव आणि कापूस दर ठरविणारी यंत्रणा या दोनच समस्या आत्महत्यांच्या मुळाशी आहेत, असे परखड मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने आयोजित विदर्भ पाणी परिषदेत ते बोलत होते. कुलगुरू डॉ. माधवी खोडे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, समय बनसोड यांची या वेळी उपस्थिती होती.

गडकरी पुढे म्हणाले, की अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ, बुलडाणा, वर्धा हे सर्वाधीक शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्हे आहेत. या आत्महत्यांवर नियंत्रण मिळवायचे असेल तर जलसंवर्धनावर भर द्यावा लागणार आहे. एका पाण्याअभावी पीक गमावण्याचे अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळेच सिंचनाच्या सोयी बळकट केल्या पाहिजे. पाण्याची उपलब्धता झाल्याशिवाय या भागातील नैराश्य दूर होणार नाही आणि शेतकरी आत्महत्या थांबणार नाहीत. केंद्रात वॉटर रिर्सोसेस



मंत्री असताना पंतप्रधान सिंचन योजना आणि बळीराजा योजना या दोन योजनेअंतर्गत १५ ते १६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. बुलडाणा जिल्ह्यातील जिगाव आणि पश्चिम महाराष्ट्रातले टेंभू, म्हैसाळ या योजनेसाठी हे पैसे दिले. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या काळात सांगोला भागात असताना त्या भागात पाणी पोहोचल्याचे पाहून आनंद झाला. त्यावरूनच ग्रामीण आणि कृषी विकासाचा संबंध हा सिंचनाशी आहे हे लक्षात येते. आपल्या जीडीपी वाढीत ५२ ते ५४ टक्के योगदान सेवा क्षेत्रातील आहे, २४ टक्के उत्पादन क्षेत्रातील तर कृषी क्षेत्रातील योगदान हे केवळ १२ ते १४ टक्के आहे. मात्र शेती क्षेत्राशी निगडित लोकसंख्या ६० ते ६२ टक्के आहे. ही लोकसंख्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिकदृष्ट्या मागासलेली आहे. त्यातूनच परिस्थितीची विवशता म्हणून यातील काहींनी आत्महत्या केल्या. त्यांचा प्रमुख संबंध पाण्याशी आहे. सिंचन प्रकल्पाची घोषणा केली जाते, त्यानंतर उद्घाटन आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात असे तीन टप्पे राहतात. या तीन मुद्यांवर अनेक आमदार निवडणुका जिंकतात ही बाब खरी आहे. त्यावरुन हा किती जिव्हाळ्याचा विषय आहे हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही. याचे आदर्श उदाहरण गोसेखुर्द प्रकल्पाचे देता येईल. १०७ कोटींच्या या प्रकल्पावर आजवर साडेबारा हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. यातील सहा हजार कोटी रुपये मी या खात्याचा मंत्री असताना त्याचवेळी दिले होते. आता हा प्रकल्प पुन्हा बंद पडला आहे. या प्रकल्पातील बाधितांचे पुनर्वसनही योग्य झाले नाही. हे प्रकार टाळायचे असतील तर जेवढा निधी आहे तितकेच प्रकल्प असे धोरण राबवायला पाहिजे, असेही गडकरी म्हणाले.

# दुधाळ जनावरांसाठी पौष्टिक चारा अनुदान..!

दूध उत्पादन वाढवायचे असेल तर दुधाळ जनावरांना योग्य प्रमाणात आणि पौष्टिक चारा मिळणं अत्यावश्यक आहे. अनेक वेळा शेतकऱ्यांना पुरेसा चारा उपलब्ध नसल्यानं दूध उत्पादनावर परिणाम होतो. ही तूट भरून काढण्यासाठी राज्य सरकारनं ''वैरण उत्पादन प्रोत्साहन योजना'' राबवण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे.

योजनेचा उद्देश काय आहे?

या योजनेचा मुख्य हेतू म्हणजे पौष्टिक चारा उत्पादनात वाढ घडवून आणणे आणि शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतात वैरण पिके घेण्यास प्रोत्साहन देणे. यामुळे केवळ दुधाचे उत्पादन वाढणार नाही, तर जनावरांच्या आरोग्यातही सुधारणा होईल.

शेतकऱ्यांना मिळणार १००% अनुदान : या योजनेतर्गत प्रत्येक पात्र लाभार्थ्याला १ हेक्टर क्षेत्रासाठी ४,००० पर्यंत बियाण्यांचे/ठोंब्यांचे मोफत वाटप करण्यात येत आहे. हे अनुदान पूर्णपणे मोफत (१००%) असेल, म्हणजेच शेतकऱ्यांना वैरणीच्या बियाण्यांसाठी खर्च करण्याची गरज नाही.

पात्रता अटी : शेतकऱ्यांकडे किमान ३ ते ४ दुधाळ जनावरे असणे आवश्यक (पशुधन प्रणालीवर नोंद असलेली). स्वतःची शेती व सिंचनाची व्यवस्था असलेली शेतजमीन असावी. खते व जीवाणू संवर्धकांचा खर्च शेतकऱ्याने स्वतः करावा. सर्व प्रवर्गातील शेतकरी लाभ घेऊ शकतात. एका वर्षात एका शेतकऱ्याला एकदाच लाभ मिळू शकतो.



अर्ज प्रक्रिया आणि वाटप : अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जातील. जिल्हा परिषद व पशुसंवर्धन अधिकारी उपलब्ध निधीच्या आधारे निवड करतील. वैरण उत्पादनासाठी ज्वारी, मका, बाजरी, बरसीम, न्युट्रीफिड, नेपियर अशा बियाण्यांचे किंवा गवताचे ठोंबे वाटण्यात येतील. बियाण्यांची खरेदी केवळ राष्ट्रीय बियाणे महामंडळ, महाबीज, कृषी विद्यापीठे, पशुधन विकास मंडळ यांच्याकडूनच केली जाईल. लागवडीपूर्वी तांत्रिक मार्गदर्शन दिले जाईल. हंगामानुसार योग्य वैरण पिकांची निवड होईल. शेतकऱ्यांसाठी फायदे : जनावरांना अधिक पौष्टिक आणि ताज्या चाऱ्याचा पुरवठा. दूध उत्पादनात वाढ. चाऱ्याच्या तुटीवर नियंत्रण. स्वावलंबी शेती व्यवस्थापन. पशुधनाच्या आरोग्यात सुधारणा.

# सोयाबीनची पेरणी करताना 'या' चुका टाळा अन्यथा नुकसान !

सोयाबीन हे महाराष्ट्रात खरीप हंगामातील एक महत्वाचे पीक आहे. हवामानातील बदल, जमिनीचा प्रकार, आणि बियाण्यांची गुणवत्ता यामुळे उत्पादनात अनेकदा फरक पडतो. पण जर पेरणीपूर्वी योग्य तयारी केली तर उत्तम उत्पादन मिळवता येऊ शकते.

योग्य जमीन आणि हवामान :सोयाबीनसाठी मध्यम ते भारी जमिन चांगली असते. खूप हलक्या किंवा आम्लयुक्त जमिनीत पीक नीट उगवत नाही. पेरणीसाठी जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून ते जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंतचा कालावधी योग्य असतो. यावेळी १०० मिमी इतका पाऊस झालेला असावा.

खोल नांगरणी : दर २ ते ३ वर्षांनी खोल नांगरणी करावी. यामुळे जमिनीत हवा खेळते, पोषणद्रव्यं नीट मिसळतात आणि मुळे खोलवर जातात. यानंतर जमिनीची मशागत विरुद्ध दिशेने दोनदा करावी.

सेंद्रिय खतांचा वापर : शेवटच्या मशागतीवेळी शेणखत, कोंबडी खत किंवा इतर सेंद्रिय खत मिसळल्याने जमिन अधिक सुपीक होते. माती मृदू राहते आणि पीक चांगले वाढते.

सब-सॉयलरचा वापर आणि बियाण्यांची तपासणी : पाण्याचा साठा टिकवण्यासाठी सब-सॉयलर वापरावा. यामुळे दुष्काळी परिस्थितीतही पीक तग धरू शकतं. त्यासोबतच दर्जेदार, अंकुरणक्षम बियाणे वापरावं. पॅकिंगवरील माहिती व बियाण्याची मुदत नक्की पाहावी.

किड व रोग नियंत्रण : पेरणीपूर्वी जमिनीत किडी किंवा रोग आहेत का हे तपासावं. गरज असल्यास योग्य उपाययोजना कराव्यात, ज्यामुळे उत्पादनावर वाईट परिणाम होणार नाही.

पाण्याचे नियोजन : सिंचन वेळेवर आणि प्रमाणात असावं. खूप पाणी किंवा खूप कमी पाणी दिल्यास पीक



खराब होऊ शकतं. शक्य असल्यास ठिबक सिंचन वापरावा.

आधुनिक साधनांचा वापर : शेतीसाठी जमिनीचं परीक्षण, मोबाईल ॲप्स किंवा आधुनिक साधनांचा उपयोग केल्यास उत्पादनात सुधारणा होते.

पेरणीचा योग्य वेळ आणि अंतर : बियाण्यांची पेरणी योग्य वेळी करावी आणि योग्य अंतर ठेवलं जावं. यामुळे प्रत्येक झाडाला वाढण्यासाठी पुरेशी जागा मिळते.

मल्चिंगचा वापर : मातीवर आच्छादन केल्याने ओलावा टिकतो, मुळे सुरक्षित राहतात आणि मातीचा अपव्यय कमी होतो.

तज्ज्ञांचा सल्ला : पेरणीपूर्वी आणि लागवडीनंतर स्थानिक कृषी अधिकारी किंवा तज्ज्ञांचा सल्ला घेत राहावा. यातून शंका दूर होतात आणि योग्य मार्गदर्शन मिळते.

योग्य निर्णय आवश्यक : सोयाबीन पेरणीपूर्वी योग्य नियोजन, योग्य जमीन, सेंद्रिय खतं, सिंचन आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन यांचा योग्य वापर केल्यास शेतकरी अधिक उत्पादन घेऊ शकतात. शेतीत वेळेवर योग्य निर्णय घेणे हीच यशाची गुरुकिल्ली आहे.

# नवीन फळबाग लागवडीची पुर्व तयारी

राज्यामध्ये सन १९९०-९१ पासून रोजगार हमी अंतर्गत १०० टक्के अनुदानित फळझाड लागवड ही महत्त्वाकांक्षी योजना सुरु झाली. तेंव्हा पासून फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील शेतकऱ्यांच्या मनावर रुजली. फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील पडीक जमिनीला मिळालेले वरदान ठरले, असे म्हटले तर वावगे ठरू नये. फळबाग लागवड यशस्वी होण्यासाठी ''फळबाग लागवडीची पूर्वतयारी आणि नियोजन'' या महत्वाच्या बाबी आहेत.

फळबागेच्या यशस्वी लागवडीकरिता महत्वाच्या बाबी : आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे? आपल्या जमिनीत फळझाडे येतील का? बारमाही पाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का? आपल्या हवामानात फळझाडे कोणत्या प्रकारची येऊ शकतील? मातीची व पाण्याची तपासणी केली आहे काय? बागेसाठी उत्तम जातीवंत कलमे कोठून उपलब्ध होऊ शकतील? जी बाग आपण लावणार आहोत त्यास बाजारपेठ उपलब्ध आहे काय? प्रक्रिया उद्योग आहेत काय? अशा सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपणास कोणती फळझाडे लावायला हवीत याचा विचार करणे महत्वाचे ठरते.

फळबागेसाठी जमिनीची निवड : आपली जमीन कोणत्या प्रकारची आहे, हलकी, मध्यम की भारी हे सर्वांना परिचित असतेच. जर माहिती नसेल तर माहिती करून घ्यावी. जमिनीची खोली किती आहे? जमिनीच्या खाली मुरूम किती खोलीवर आहे? जमिनीचा निचरा कसा आहे? त्याचा अभ्यास करूनच फळबाग निवडावी. फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमिन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत,



मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा. मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा कमी असावे. जमिनीचा उतार २ ते ३ टक्क्यापेक्षा जास्त नसावा. ज्या ठिकाणी फळबाग लावायची आहे, त्या ठिकाणच्या मातीचे परिक्षण करून घेणे आवश्यक आहे. फार खोल असणाऱ्या जमिनी, क्षारयुक्त जमिनी, चोपण जमिनी यातून पाण्याचा निचरा योग्य होत नाही अशा जमिनीत प्रारंभी झाडे वाढल्यासारखी दिसली तरी पुढे वाढीचा वेग मंदावतो व उत्पादन मिळत नाही. काही वेळा झाडे मरण्याची संभावना असते. तसेच ज्या जमिनीत मुक्त चुनखडीचे प्रमाण १० % पेक्षा जास्त आहे अशा जमिनीत फळबागेची वाढ होत नाही.

माती परिक्षण करण्यासाठी फळबाग क्षेत्रातील मातीचा नमुना : फळबागे करिता मातीचा नमुना घेताना जमिनीच्या प्रकारानुसार प्रातिनिधिक नमुना घ्यावा. सर्वप्रथम ३ बाय ३ बाय ३ फुट खोलीचा (१०० से.मी) किंवा मुरूम लागेपर्यंत खड्डा करून पृष्ठभागापासून प्रत्येक फुटातील प्रतिनिधिक नमुना काढावा व तो वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये भरून तपासणी साठी पाठवावा.माती परीक्षणाप्रमाणेच पाण्याची तपासणी करणे आवश्यक आहे.आपले विहिरीचे/ बोअर चे पाणी क्षारयुक्त वा मचूळ असू नये ते गोड असावे. तेव्हा माती बरोबरच,पाण्याचेही रासायनिक परिक्षण करून घ्यावे आणि त्या अनुषंगानेच फळझाडांची निवड करावी.

फळबागेसाठी पाण्याची उपलब्धता : बागायती फळझाडांना नियमित पाणी द्यावे लागते, अशा बागायती फळझाडांची लागवड करताना कितपत पाणीपुरवठा पुरेल किंवा पाण्याची उपलब्धता किती आहे, याचा विचार करूनच नियोजन करावे. कोरडवाहू फळपिकांना लागवडीच्या सुरुवातीस पहिली तीन ते चार वर्ष पाण्याची, चांगल्या व समाधानकारक वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असते. पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळझाडांची निवड करावी.

हवामानानुसार फळपिकांची लागवड : महाराष्ट्रातील हवामान फळबाग लागवडीसाठी खुपच अनुकूल आहे. यामुळे हवामांनाच्या बाबतीत फळबाग लागवड करताना शेतकऱ्यांना फारसा विचार करावा लागत नाही. आपल्या राज्याचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रात आंबा, केळी, चिकू, पपई, नारळ अशा प्रकारची फळझाडे घ्यावीत.पूर्वेकडील उष्ण व कोरड्या हवामानात संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू,पेरू,द्राक्षे,डाळिंब यासारखी फळझाडे घ्यावीत. कोकणसारख्या अति पावसाच्या भागात चिकू, नारळ, फणस, आंबा काजू यासारखी फळझाडे घ्यावीत. अति कमी पावसाच्या भागात बोर, सीताफळ, आवळा, चिंच अशी कोरडवाहू फळझाडे घ्यावीत.

फळबाग लागवडीचे अंतर

विविध फळझाडांसाठी खड्डा खोदणे आणि भरणे महत्वाचे, त्याकरिता खड्ड्याचा आकार किती असावा ? हे खड्डे केंव्हा घ्यावेत? आणि केंव्हा भरावेत आणि कसे? जेथे फळझाडांची लागवड करावयाची आहे, तेथे योग्य त्या अंतरावर चौरस पद्धतीने आखणी करून खड्डे खोदावेत. जमिनीच्या मगदुराप्रमाणे आणि फळझाडांच्या प्रकारानुसार खड्ड्याचा आकार ठरवावा.फळबाग लागवडीची योग्य वेळ : खात्रीशीर पाऊस झाल्यावर पावसाच्या सुरुवातीस जून महिना अगर जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. अतिपावसात अगर पावसाच्या शेवटी सप्टेबर-ऑक्टोबर मध्ये फळझाड लागवड करू नये. पावसाच्या सुरुवातीस लागवड केलेली झाडे चांगली समाधानकारक वाढतात. काही कालावधीकरिता पाण्याचा ताणही सहन करू शकतात.जून-जुलै पर्यंत वेळेवर झाडांची लागवड झाल्यास वाढ जोमाने होते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### बॉलपॉईंट पेन दिवस
### जागतिक दृष्टीदान दिन.

### महत्वाच्या घटना

१७६८ : माधवराव पेशवे आणि राघोबादादा यांच्यामधे धोडपची लढाई झाली. त्यात राघोबादादा पराभूत झाला.
१९१८ : पहिले महायुद्ध - इटलीच्या छोट्या मोटारबोटीने टोरपेडो मारुन हंगेरीची बॅटलशिप एस.एम.एस. इस्तवान बुडवली.
१९२४ : इटलीच्या समाजवादी नेता ज्याकोमो मॅट्टेओटी यांची हत्या.
१९३५ : ॲक्रन, ओहायो येथे बॉब स्मिथ व बिल विल्सन यांनी 'अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस' या संस्थेची स्थापना केली.
१९४० : दुसरे महायुद्ध - नॉर्वेने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४० : दुसरे महायुद्ध - इटलीने फ्रान्स व इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४४ : ओराद-सुर-ग्लेनची कत्तल, स्त्री बालकांसह ६४२ व्यक्तींची हत्या.
१९६६ : 'मिग' या जातीच्या विमानांची नाशिक येथे निर्मिती.
१९७७ : ॲपल कॉम्प्युटर्सने आपला 'ॲपल-' हा संगणक विकण्यास सुरूवात केली.
१९८२ : पासून दृष्टीदिन महाराष्ट्र राज्यात साजरा केला जातो.
१९९९ : उस्ताद झाकीर हुसेन यांची अमेरिकेतील प्रतिष्ठाप्राप्त 'नॅशनल हेरिटेज गौरववृत्ती' साठी निवड
२००३ : स्पिरिटरोव्हर मंगळाकडे रवाना.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२१३ : फख्रुद्दीन 'इराकी' पर्शियन तत्त्वज्ञ
१८७३ : स्वामी विराजनंदा - भारतीय तत्ववेत्ता,लेखक
१८९० : भारतीय सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न सन्मानित भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ता व राजकारणी तसचं, आसाम प्रांताचे शेवटचे पंतप्रधान व आसाम राज्याचे पहिले मुख्यमंत्री गोपीनाथ बोरदोलोई यांचा जन्मदिन.
१९०६ : गुलाबदास हरजीवनदास ब्रोकर - गुजराती लेखक व समीक्षक, पद्मश्री (१९९१), गुजराती साहित्य परिषदेचे अध्यक्ष, गुजरातीतील मनोविश्लेषणात्मक कथेची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. (मृत्यू: २० सप्टेंबर १९०९ पोरबंदर, सौराष्ट्र, गुजरात)
१९०८ : भारताचे लष्करप्रमुख, हैदराबादचे लष्करी प्रशासक व भारताचे कॅनडातील राजदूत, पद्मविभूषण जनरल जयंतीनाथ चौधरी यांचा जन्म. (मृत्यू: ६ एप्रिल १९८३)
१९१५ : सौल बेल्लो - नोबेल पारितोषिक विजेते लेखक
१९१६ : डंचिन डोनट्स चे स्थापक विल्यम रोसेनबर्ग यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर २००२)
१९२४ : के. भालचंद्र - नेत्रशल्यविशारद (मृत्यू: १९८९)
१९३८ : राहुल बजाज - बजाज उद्योग समूहाचे प्रमुख.
१९३८ : भारतीय गणितज्ञ आणि शैक्षणिक वासंती एन. भाट नायक यांचा जन्म. (मृत्यू: १२ फेब्रुवारी २००९)
१९५५ : वेद प्रकाश शर्मा - भारतीय लेखक
१९५५ : प्रकाश पदुकोण - ऑल इंग्लंड चॅम्पियनशिप जिंकणारा पहिला बॅडमिंटनपटू
१९५८ : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यिक व समाजसेवक अनुप सेठी यांचा जन्मदिन.
१९६० : नंदामुरी बालकृष्णा - भारतीय चित्रपट अभिनेते, राजकीय नेते
१९७२ : प्रसिद्ध भारतीय अमेरिकन व्यावसायिक कार्यकारी अधिकारी, अल्फाबेट इंक चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गुगल चे व्यवस्थापकीय कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई यांचा जन्मदिन.
१९८१ : सर्वोत्कृष्ट भारतीय खेळाडूचा भारतीय खेल रत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार आणि पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध सुवर्ण पदक जिंकणारे पहिले भारतीय पॅराऑलम्पिक भाला फेकपटू देवेंद्र झाझरिया यांचा जन्मदिन.
२००० : जगातील सर्वोच शिखर माउंट एवरेस्ट ची मोजणी करणाऱ्या व ते शिखर केवळ एक वर्ष आणि अकरा महिन्यात सर करणाऱ्या विश्वातील पहिली युवा गिर्यारोहिका भारतीय युवा गिर्यारोहिका मालावथ पूर्णा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३६ : आंद्रे ॲम्पिअर - फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १७७५)
१८७७ : रामनाथ टागोर - भारतीय समाजसुधारक
१९०३ : लुइगी क्रेमॉना - इटालियन गणितशास्त्रज्ञ.
१९०६ : गुजराती लेखक समीक्षक गुलाब दासब्रोकर यांचे निधन.
१९४९ : सिग्रिड उंडसेत, नोबेल पारितोषिक विजेते लेखक
१९५५ : भारतीय-अमेरिकन गोल्फर मार्गारिट ॲबॉट यांचे निधन. (जन्म: १८७८)
१९५७ : भाई विर सिंघ, भारतीय पंजाबी लेखक,कवी. लुइगी क्रेमॉना, इटालियन गणितशास्त्रज्ञ.लुइगी क्रेमॉना, इटालियन गणितशास्त्रज्ञ.
१९७६ : पॅरामाउंट पिक्चर्स चे सहसंस्थापक ॲडॉल्फ झुकॉर यांचे निधन. (जन्म: ७ जानेवारी १८७३)
१९८७ : प्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता जीवन यांचे निधन.
२००१ : फुलवंताबाई झोडगे - सामाजिक कार्यकर्त्या, सावित्रीबाई फुले यांचा वारसा विसाव्या शतकातुन एकविसाव्या शतकापर्यंत नेण्याचे कार्य झोडगेअक्कांनी केले.
२००६ : गुलाबदास हरजीवनदास ब्रोकर - गुजराती लेखक व समीक्षक, पद्मश्री (१९९१), गुजराती साहित्य परिषदेचे अध्यक्ष, गुजरातीतील मनोविश्लेषणात्मक कथेची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते.
२०१९ : गिरीश कर्नाड - ज्ञानपीठ पुरस्कार विजेते अभिनेते व दिग्दर्शक (जन्म: १९ मे १९३८)

# ग्रामीण रस्त्याची कामे सुरू करण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

## आ.संदीप क्षीरसागरांच्या दबावतंत्रामुळे बीड तालुक्यात रस्त्याची कामे रखडल्याचा आरोप

बीड। प्रतिनिधी

दि.९ : तालुक्यातील ग्रामीण भागातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील ग्रामीण रस्त्यांची कामे आ.संदीप क्षीरसागर यांनी अडविल्याचा आरोप करत अनेक गावचे सरपंच, पदाधिकाऱ्यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी (दि.९) सकाळी ११ वाजता लक्षवेधी धरणे आंदोलन सुरू केले आहे. हे आंदोलन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, भाजपचे जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, युवा नेते महेश धांडे, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ.लक्ष्मण जाधव, महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ॲड.सतीश शिंदे, भाऊसाहेब डावकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवकचे बीड तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे, पंचायत समितीचे माजी सदस्य उत्तरेश्वर सोनवणे, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, अरुण लांडे, प्रदीप गायकवाड, सरपंच धनेश्वर खेत्रे, दत्ता जाधव, रोहित जाधव, सिद्धार्थ जाधव, राजाभाऊ नवले, लकी कंडेरे, राजू टाक, सुमंत राऊत, नामदेव म्हेत्रे, सखाराम राऊत, सचिन उनवणे यांच्यासह अनेकजण सहभागी झाले होते.





### प्रशासनाच्या भूमिकेचा निषेध

वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रशासनाकडून या प्रकरणाची दखल घेतली जात नाही. त्यामुळेच आम्हाला रस्त्यावर उतरावे लागले, असे सांगत आंदोलकांनी प्रशासनाच्या भूमिकेचा तीव्र निषेध व्यक्त केला. धरणे आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करत ग्रामस्थांनी रोष व्यक्त केला.

### रास्ता रोकोचा इशारा कायम

आजच्या आंदोलनातूनही प्रशासनाने सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर सोमवार, १६ जून रोजी जरुड फाटा येथे रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही सरपंच ॲड.राजेंद्र राऊत यांनी दिला आहे. जबाबदार अधिकारी घटनास्थळी उपस्थित राहेपर्यंत रास्ता रोको मागे घेतला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ॲड.राजेंद्र राऊत यांनी म्हटले की, आ.संदीप क्षीरसागर यांच्या दबावतंत्रामुळे अधिकारी रस्त्याचे मार्कआऊट देत नसून रस्त्याचे काम रखडले आहे. त्यामुळे आमदारांसह अधिकाऱ्यांचा निषेध करण्यासाठी आंदोलन करत असल्याचे सांगितले. बीड तालुक्यातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील नाळवंडी ते मौज व्ही.आर.क्र. २४३ काळेगाव हवेली ते लमाण तांडा रस्ता व्ही.आर. ३५४, ओडीआर ५० ते मानकुरवाडी रस्ता व्ही.आर. ३७, पाली ते वरवटी इजिमा १२७, पाली ते वरवटी इजिमा १२७ यांसह इतर अनेक रस्ते सुधारणा अंतर्गत कामे आहेत. सदर रस्ते हे जिल्हा नियोजनमधून सन २०२४ या वर्षामध्ये मंजूर आहेत. सदर रस्त्याचे कार्यारंभ आदेश ६ महिन्यांपूर्वी झालेले आहेत. या रस्त्याचे काम सन २०२४ मध्ये जिल्हा नियोजन समितीमार्फत मंजूर झाले असून, डिसेंबर २०२४ मध्ये कामाचे कार्यारंभ आदेश निघाले आहेत. मात्र, बीडमधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता, उपअभियंत्यांकडून अद्यापही कामाचे मार्कआऊट देण्यात आलेले नाहीत. आ.संदीप क्षीरसागर यांना ज्या भागातून अल्प मतदान झाले, त्या त्या भागातील कामे थांबवण्यात येत असल्याचा आरोप सरपंच ॲड.राऊत यांनी केला आहे.

### काम रखडल्याने ग्रामस्थ हैराण

सदरील रस्ता रहदारीचा असून, काम रखडल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तत्काळ मार्कआऊट करून काम सुरू करण्यात यावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. या आंदोलनाची प्रत पालकमंत्री ना.अजित पवार, जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, पोलीस प्रशासन यांना देण्यात आली आहे

यापूर्वीही त्यांनी अनेक विकासकामात खोडा घातला, परंतु यापुढे त्यांची मनमानी सहन केली जाणार नाही, त्यांच्याविरोधात वेळोवेळी आवाज उठविला जाईल, असा इशाराही ॲड.राऊत यांनी दिला आहे. दरम्यान, मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना देण्यात आले. यावेळी बीड तालुक्यातील अनेक गावचे सरपंच, पदाधिकारी, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# तीस वर्षांनी पुन्हा भरली भगवान विद्यालय शाळा




बीड। प्रतिनिधी

शाळा म्हणजे फक्त शिक्षण देणारी इमारत नसते, ती असते आठवणींचं गाठोडं, आपुलकीचा ओलावा, आणि शालेय मित्रमैत्रिणींसोबत घालवलेल्या निरागस दिवसांचा एक अमूल्य ठेवा. याच आठवणींना उजाळा देण्यासाठी भगवान विद्यालय, बीड येथे १९९५–९६ च्या बॅचचा गेट–टुगेदर आयोजित करण्यात आले होते. तब्बल ३० वर्षांनंतर पुन्हा एकदा विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शाळेची पायरी ओलांडली, आणि वातावरणात भावनांचा, आनंदाचा, गप्पांचा ओघ दरवळून गेला.

या कार्यक्रमाचे आयोजन सर्व १९९६ बॅच च्या माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने पार पडले. अध्यक्षस्थानी मा. श्री. गो. गो. मिसाळ सर (कार्याध्यक्ष, भगवान विद्या प्रसारक मंडळ) हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. झेड. एन. सानप (संस्थाध्यक्ष) यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. शाळेचे सर्व माजी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि जवळपास ५५ विद्यार्थी मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.

शिक्षकांचे औक्षण आदराची आणि कृतज्ञतेची अमूल्य सावली कार्यक्रमाची सुरुवात ठीक सकाळी ८ वाजता झाली. ३० वर्षांपूर्वी आपल्याला ज्ञानदान करणाऱ्या, घडवणाऱ्या प्रत्येक शिक्षकांचे औक्षण करताना डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. ही केवळ औपचारिकता नव्हती ती होती मन:पूर्वक व्यक्त केलेली कृतज्ञता. आज आम्ही थोडे यशस्वी झालो असलो, तरी मूळ संस्कारांचे बीज पेरणारे तेच गुरुजन होते म्हणून त्यांच्या चरणी त्यांचे औक्षण करून आभारांची परंपरा जपली. राष्ट्रगीतानंतर स्व. भा. वा. सानप सरांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या पूजनाच्या माध्यमातून शाळेच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या स्व. भा. वा. सानप सरांप्रती श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आणि त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करत कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी, आम्हा सर्वांना घडवणाऱ्या आणि आज आपल्यात नसलेल्या स्वर्गीय शिक्षकांना तसेच आयुष्यात विविध टप्प्यावर साथ दिलेल्या, पण आज काळाच्या पडद्याआड गेलेल्या आमच्या प्रिय सहपाठी मित्रांना सर्वांना द्रव अंतःकरणाने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ही श्रद्धांजली म्हणजे केवळ एक परंपरा नव्हे, तर आमच्या मनातील कृतज्ञता, सन्मान आणि आठवणींचा उजाळा होता. सहकारी मित्र राजेश गदळे याने अतिशय ओघवत्या शैलीत आणि भारदस्त आवाजात सूत्रसंचालन करून सर्व उपस्थितांचे मन जिंकले. कार्यक्रमाची प्रस्तावना सहकारी मित्र अजय शेरकर याने अत्यंत प्रभावी शब्दांत सादर केली. त्याने कार्यक्रमाच्या उद्देशाला सुस्पष्ट स्वरूप देत उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून अरुण पवार, अरुणा राठोड, जगदीश वाघमारे आणि सुदर्शन खोड यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत, शाळेचा ऋणानुबंध शब्दबद्ध केला. त्यांच्या मनोगतातून बालपणाचे क्षण, शिक्षकांचा प्रभाव, आणि एकत्र घालवलेला काळ जिवंत झाला. आम्हाला शिकवणाऱ्या सर्व मान्यवर शिक्षकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या वेळी त्यांना विशेषतः तयार केलेली स्मृतिचिन्हे व आकर्षक भेटवस्तू देऊन कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून सन्मानित करण्यात आले. यानंतर शिक्षकांमधून श्री मराडे सर आणि श्री झेड एन सानप सर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, जीवनाचे धडे, मूल्यांची जपणूक आणि पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी विचार मांडले. अध्यक्षीय समारोप करताना मा. गो. गो. मिसाळ सरांनी शाळेच्या वाटचालीचा आढावा घेत, १९९६ बॅचच्या एकतेचा व कौतुकाचा विशेष उल्लेख केला.

# दिव्यांगांसाठी होमिओपॅथिक शिबिर यशस्वीरित्या

बीड। प्रतिनिधी

दि.०८:आदर्श शिक्षण संस्था संचलित सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय, बीड आणि प्रिडीक्टिव्ह होमिओपॅथी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ०८ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेले दिव्यांग होमिओपॅथिक शिबिर'' अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले. शिबिरादरम्यान डॉ. अनिकेत शितोळे, डॉ.योगेश खर्चे यांनी च्या सिद्धांतानुसार प्रत्येक रुग्णाची सखोल घेऊन, विश्लेषण करून एकूण ३४० रुग्णांची तपासणी केली व होमिओपॅथिक औषधोपचार दिले. यामध्ये मतिमंदता, गतिमंदता,मूकबधिरता, झटके आणि इतर असाध्य आजार असलेल्या




बालकांचा समावेश होता.शिबिरात ३५ पेक्षा अधिक स्वयंसेवक, १९ डॉक्टर्स, तसेच ३६ आंतरवासियता प्रशिक्षणार्थी विद्यार्थी यांनी सहभागी होऊन शिबिराच्या यशस्वीतेसाठी मदत केली. अनेकांनी याआधी केलेल्या उपचारांमुळे निराशा आली होती, परंतु या शिबिरात दिलेल्या उपचार व मार्गदर्शनामुळे पालकांच्या चेहऱ्यावर आशेचा किरण दिसत होता.

काही रुग्णांमध्ये आधीच्या शिबिरांतील उपचारांमुळे सुधारणा दिसून आली तसेच काही अत्यंत दुर्मिळ व गुंतागुंतीच्या केसचा अभ्यास करणे ही विद्यार्थी व डॉक्टर्ससाठी शैक्षणिक संधी ठरली. या उपक्रमाचे नेतृत्व जगप्रसिद्ध संकल्पनेचे प्रवर्तक कै. डॉ. प्रफुल्ल विजयकर यांच्या विचारधारेवर आधारित असून, हे शिबिर संस्थेचे सचिव श्री. जयदत्त अण्णा क्षीरसागर (माजी मंत्री, महाराष्ट्र सरकार ) यांच्या प्रेरणेतून गेली १५ वर्षे सातत्याने आयोजित केले जात आहे.सदर शिबिर महाविद्यालयाचे मार्गदर्शक डॉ. अरुण भस्मे, प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उप–प्राचार्य डॉ. गणेश पांगारकर, बाहयरूग्ण विभाग प्रमुख डॉ.अंजली पांगारकर,शिबिर समन्वयक डॉ. अमित भस्मे ,बालरोग विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. पूनम शिंदे, सामाजिक कार्यकर्ते श्री. मुळी (सोशल वर्कर) यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आले होते. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी पदव्यूत्तर विभागातील विद्यार्थी डॉ. दिपक काळभिले, डॉ. ऋषीकेश मोहिते, डॉ. अहिल्या गावडे, डॉ. कोमल शिंगणे, नायाब खान, अमान खान,सोनाली क्षीरसागर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# फसव्या योजना जनतेसमोर उघड करा–आ. पाटील

बीड। प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कळंब धाराशिव चे आमदार मा. कैलास पाटील यांनी आज जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या संपर्क कार्यालयास भेट दिली. महायुती सरकारच्या निवडणुकी पूर्वी दिलेल्या फसव्या योजना, आश्वासने या विरोधात 'क्या हुवा तेरा वादा' या अनोख्या आंदोलना विषयी चर्चा केली.

महायुती सरकार स्थापने पूर्वी ज्या फसव्या योजना, आश्वासने जाहीर केली ती प्रखरतेने जनतेसमोर मांडा, गाव तांडा वस्ती वर जाऊन या सरकारचा खरा चेहरा जनतेला दाखवा असे आमदार कैलास पाटील म्हणाले. यावेळी त्यांनी शिवसैनिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांचा सत्कार जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केला, सोबत उपजिल्हाप्रमुख हनुमंत जगताप, राजु माहुवाले, सुशील पिंगळे, रवी वाघमारे, युवासेनेचे बबलु दिवे, नवनाथ प्रभाळे, प्रदीप कोटुळे, पंकज कुटे, गणेश लोणकर, सतीश परदेशीं, मारुती वाघचौरे अक्षय काशीद, रंगनाथ पैठणकर, नंदकुमार घोगरे, विशाल तांबे सह आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समृद्ध लोकशाही उभारण्यासाठी ॲड प्रकाश आंबेडकरांचा सामाजिक अभिसरणाचा प्रयोग–भास्कर भोजने

बीड। प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे प्रणेते तथा राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी १९८० पासून सक्रिय राजकारणास सुरुवात केली. महाराष्ट्राच्या राजकारणात विविध प्रयोग राबवित सत्तेमध्ये सहभागी व्हायचा प्रयत्न केला परंतु स्वयंघोषित बुद्धिजीवी विचारवंत यांनी त्याच्या भूमिका गोपनीय बैठका घेऊन मोडून तोडून ऐकीव कथा रचल्या, प्रकाश आंबेडकरांनी काँग्रेस सोबत युती करायला हवी होती असे चहाच्या टपरीवर बसून चर्चा घडवून आणायच्या, पंढरपुरातील मंदिर उघडणे अशा विविध भूमिकेला मोडून तोडून मांडणी केल्याने वंचितचा मतदार दुरावत गेला असे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष अजय सरवदे यांनी प्रतिपादन केले.

महाराष्ट्राच्या राजकारणात व समाजकारणात ४२ वर्षाच्या वाटचालीमध्ये प्रकाश आंबेडकरांनी शांतीदुताची भूमिका पार पाडली. विविध जाती धर्मांच्या समूहांना एकसंध जोडून वंचित,उपेक्षित



घटकांना न्याय मिळवून दिला.असे प्रतिपादन फुले शाहू आंबेडकर विद्वत महासभेचे राष्ट्रीय सल्लागार भास्कर जी भोजने यांनी यावेळी केले. ''आता तरी प्रकाश आंबेडकरांना समजून घ्या''या परिसंवाद मेळाव्याच्या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून भोजने बोलत होते.याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना भास्कर जी भोजने यांनी ॲड. प्रकाश आंबेडकरांनी उभारलेल्या सामाजिक ,राजकीय, भूमिकां बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी विचार मंचावर वंचित बहुजन आघाडी बीड (प) चे जिल्हा, तालुका, शहर पदाधिकारी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# दलित महासंघाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी मसू पवार

## संस्थापक अध्यक्ष प्रा.मच्छिंद्र सकटे यांनी केली नियुक्ती

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीत सक्रिय व आक्रमक असणाऱ्या दलित महासंघ या सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक मच्छिंद्र सकटे यांच्या आदेशाने बीड येथील सामाजिक कार्यकर्ते मसु पवार यांची दलित महासंघाच्या बीड शहर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते तथा दलित महासंघाचे सक्रिय कार्यकर्ते गोरख मोमिन यांची उपस्थिती होती.



महाराष्ट्रात दलित महासंघाच्या माध्यमातून युवाशक्तीला चळवळीचे केंद्रबिंदू बनवत राज्यात अन्याय, अत्याचार विरोधात खंबीरपणे साथ देणाऱ्या दलित महासंघाच्या संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक मच्छिंद्र सकटे यांच्या मार्गदर्शनाखाली मसू पवार यांची शहर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

या निवडीचे सर्व स्तरातून पवार यांचे अभिनंदन होत असून मातंग समाजाचे युवा नेते व भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती जमाती महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अनिल चांदणे यांच्या वाढदिवसानिमित्त प्राध्यापक मच्छिंद्र सकटे यांनी अनिल चांदणे यांना शुभेच्छा दिल्या असून मसू पवार यांना पुढील कार्यास दलित महासंघाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

**टीसी हरवला आहे**

संदीप गणपत नागरगोजे नावाचा B.Sc SY पासचा टीसी पाटोदा ते सावरगाव सोने प्रवासादरम्यान दि. ५ जुन रोजी हरवला आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क
७४९९७३३३७०

# अवकाळीने कांदा सडला कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात

**असंवेदनशील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे म्हणतात ढेकळाचे पंचनामे करायचे का?**

**पंचनामे करायला प्रशासनाला वेळ नाही :– डॉ.गणेश ढवळे**

लिंबागणेश। प्रतिनिधी

अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.साठवणुक केलेला आणि बाजारात विक्रीसाठी तयार कांदा वादळीवाऱ्यासह पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे जमिनीतील ओलावा वाढल्याने कांद्याच्या साठवणुकीवर परीणाम झाला असून कांद्याला ओल लागली आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना हा कांदा मिळेल त्या भावात विकावा लागणार आहे परीणामी शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असुन तोंडचा घास हिरावला आहे.

साडे ३ एकर कांद्याची लागवड करण्यात आली.जवळपास रोपं,बि बियाणे,खत, फवारणी आदि २ लाख रुपयांच्या वर खर्च झालेला आहे. अवकाळी पावसाने काही कांदा शेतातच सडला तर काढुन झाकुन ठेवलेला कांदा पाण्याखाली गेला आणि तो काळपट



पडला आहे तर काही कांद्याला कोंब फुटले आहेत.

सध्या चांगल्या कांद्याला १५ रुपये पर्यंत भाव आहे.मग या काळपट पडलेल्या कांद्याला कोण विचारणार? सरकारचे धोरण चुकीचे आहे.त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही आणि दुष्काळात तेरावा महिना म्हणल्याप्रमाणे अवकाळी पाऊस आणि महसूलचे अधिकारी पंचनाम्यासाठी फिरकत नाहीत आता तुम्हीच सांगा शेतकऱ्यांनी कसं जगायचं असा उद्विग्न सवाल लिंबागणेश येथील कांदा उत्पादक शेतकरी कल्याण भालचंद्र वाणी यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना केला.

गेल्या आठवड्यात सिन्नर तालुक्यात अवकाळी पावसाने झालेल्या पिकांच्या नुकसानीची पाहणी करताना शेतातुन बाहेर काढुन ठेवलेल्या कांद्याचे पंचनामे करण्यात येऊन नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केल्यानंतर असंवेदनशील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी '' काढलेल्या पिकांचे पंचनामे करून काय करायचे? ढेकळाचे पंचनामे करायचे का? असा सवाल शेतकऱ्यालाच विचारला.

तसेच शेतात पडलेल्या कांद्याचे पंचनामे करायचे हे नियमात बसत नाही असे म्हणत शेतकऱ्यांबद्दल सहानुभूती पुर्वक विचार करण्याची मानसिकता नसल्याचे दाखवून दिले.त्यामुळे महसूल प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी पंचनामे करायला कशाला पुढाकार घेतील असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.

राज्य लोकतंत्र



# आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेसाठी 'नवकेशर' च्या ६ विद्यार्थ्यांची निवड

## अखिल भारतीय सांस्कृतिक संघ, पुणे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील नृत्य स्पर्धेत नवकेशरचे यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय सांस्कृतिक संघ, पुणे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील नृत्य स्पर्धेत स्पृहणीय यश मिळविले आहे. त्यामुळे नवकेशरच्या ६ स्पर्धक विद्यार्थ्यांची निवड ही थायलंड येथे होणाऱ्या आगामी आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल निवड झालेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांचे सर्वस्तरांतून कौतुक होत आहे.**

याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमीचे प्रमुख भिमाशंकर शिंदे यांनी सांगितले की, नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय सांस्कृतिक संघ, पुणे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील नृत्य स्पर्धेत आमच्या ६ विद्यार्थ्यांनी स्पृहणीय यश मिळविले आहे. त्यामुळे या स्पर्धेत पात्र ठरलेले स्पर्धक विद्यार्थी थायलंड येथे होणाऱ्या आगामी आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेसाठी निवडले गेले आहेत. या स्पर्धकांमध्ये श्रावणी साखरे, अद्विक रांदड, सौम्या जोगदंड, आद्या मोमले, गणेश बाहेती आणि आर्यन नांदुरे यांचा समावेश आहे. जे स्पर्धक राष्ट्रीय स्पर्धेत विजयी होतात फक्त तेच स्पर्धक विद्यार्थी हे आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेसाठी पात्र ठरतात. नवकेशर सेवाभावी संस्था अंतर्गत नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमी ही मागील तब्बल १७ वर्षांपासून संस्थेच्या अध्यक्षा सौ.आरती भिमाशंकर शिंदे (लिंबगावकर) यांच्या सातत्यपूर्ण सहकार्य व मार्गदर्शनानुसार अविरत सुरू आहे. आता पर्यंत आपल्या अकॅडमी मध्ये तब्बल २२ हजार विद्यार्थ्यांनी नृत्याचे प्रशिक्षण घेतले आहे. आज पर्यंत जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत आपल्या विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण कामगिरी करीत सहभाग घेतला आहे. अखिल भारतीय सांस्कृतित संघ, पुणे आयोजित सन २०१४ साली सिंगापूर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत आपल्या अकॅडमीचे सहा विद्यार्थी विजेते झाले आहेत. त्यानंतर सन २०१८ साली दुबई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत अकॅडमीची विद्यार्थीनी श्रेया बजाज ही सुवर्णपदक विजेती ठरली व सन २०१९ मध्ये पुन:श्च एकदा सिंगापूर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत अकॅडमीच्या ७ विद्यार्थ्यांना गोल्ड, सिल्व्हर व ब्राँझ मेडल मिळाले. मागील १७ वर्षांपासून आपण विद्यार्थ्यांना नृत्य व नाट्य क्षेत्रात विविध प्रकारच्या संधी उपलब्ध करून देत आहोत. आपल्या अकॅडमीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मराठी अल्बम, राज्य नाट्य स्पर्धा, शॉर्ट फिल्म अशा वेगवेगळ्या ठिकाणी संधी मिळवून दिली जाते. आपल्या अकॅडमी मध्ये वय वर्षे ४ पासून पुढील सर्वच वयोगटातील विद्यार्थी नृत्याचे प्रशिक्षण घेत आहेत. नृत्य शिकल्यामुळे चित्रपट क्षेत्रात, नाट्य क्षेत्रात, मराठी अल्बम अशा विविध क्षेत्रांत अनेक संधी आता सहज उपलब्ध होत आहेत. तसे पहायला गेले. तर नृत्य व त्याचे खूप सारे फायदे आहेत, नृत्यामुळे शारीरिक स्वास्थ सांभाळले जाते, मानसिकदृष्ट्या तणावमुक्त जीवन जगता येते. आपल्या अकॅडमी मध्ये बॉलिवूड, लावणी, वेस्टर्न, सेमी क्लासिकल, हिप हॉप, कंटेम्पररी व सर्व महाराष्ट्रीयन लोकनृत्य प्रकार ही शिकविले जातात. नवकेशर अकॅडमी सुरू करण्यामागचा मुख्य उद्देश हाच होता की, जे नृत्य विषयक शिक्षण मला अंबाजोगाईत मिळाले नाही. ते येथील विद्यार्थ्यांना सहजपणे मिळावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नृत्य क्षेत्रात आपले करियर करता यावे. अंबाजोगाई ही कलावंतांची खाण म्हणून ओळखली जाते. पण, या कलावंतांना योग्य मार्गदर्शन मिळावे व योग्य संधी उपलब्ध करून देण्यासाठी या अकॅडमीची आमच्याकडून सुरूवात करण्यात आली. आपल्या अकॅडमीचे विद्यार्थी मराठी फिल्म इंडस्ट्री मध्ये ही काम करीत आहेत. ज्यात नंदन नावंदर आणि ऋषिकेश मुंदडा यांचा आवर्जून उल्लेख करता येईल. लवकरच आपण आपल्या अकॅडमीच्या माध्यमातून आई योगेश्वरी देवीची महिमा सांगणारे मराठी अल्बम व शॉर्ट फिल्मची निर्मिती करणार आहोत. अंबाजोगाई मधील नवकेशर ही

पान ३ वर

थायलंड येथील आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी



अद्विक रांदड, आर्यन नांदुरे, गणेश बाहेती, सौम्या जोगदंड, आद्या मोमले, श्रावणी साखरे



## डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतले प.पू.पंडित प्रदीप मिश्रा यांचे दर्शन



बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या रौप्य महोत्सवानिमित्त बीड तालुक्यातील चाकरवाडी येथे सुरु झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहात आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त कथा प्रवक्ते प.पू.पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिवपुराण कथेला उत्साहात सुरुवात झाली आहे. त्यांचे कथेच्या दुसऱ्या दिवशी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दर्शन घेतले.

कथेच्या सुरुवातीला ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या उपस्थितीत पूजा पार पडली. त्यांचे देखील आशीर्वाद घेऊन पान ३ वर

## शासकीय इमारतींसाठी जागा उपलब्धतेबाबत आ.प्रकाश सोळंके यांनी घेतली आढावा बैठक

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव,धारूर आणि वडवणी तालुक्यांमध्ये नव्याने उभारण्यात येणाऱ्या शासकीय इमारतींसाठी आवश्यक जागा उपलब्धतेबाबत आ.प्रकाश सोळंके यांनी दि ०६ जून रोजी येथील तहसील कार्यालयात आढावा बैठक पार पडली.यामध्ये विविध शासकीय कार्यालयांच्या जागा उपलब्ध करण्याच्या प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली:

येथील तहसील कार्यालयात दि ०६ जुन रोजी माजलगाव तहसील कार्यालयात आ.प्रकाश सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत माजलगाव विधानसभा मतदारसंघातील माजलगाव, वडवणी तालुक्यातील धारुर, विवीध शासकीय कार्यालयांच्या



इमारतीच्या जागा उपलब्ध करण्या संदर्भात आढावा बैठक आयोजित केली होती.यामध्ये माजलगाव प्रशासकीय इमारत जलसंपदा विभागाच्या केसापुरी वसाहत येथील जागा महसूल विभागाकडे वर्ग करून घेण्याबाबत कार्यवाही,माजलगाव येथे २५० विद्यार्थ्यांची क्षमता असलेले मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह,ऊसतोड कामगार मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वस्तीगृह,धारूर येथे,धारुर येथील ऊसतोड कामगार मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वस्तीगृह, वडवणी येथे ऊसतोड कामगार मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वस्तीगृह,शासकीय मागासवर्गीय मुलींसाठी वस्तीगृह,तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय व कृषी उत्पन्न बाजार समितीची इमारत यासंबंधी सर्व संबंधित विभागांनी तात्काळ जागेचे सर्वेक्षण करून १५ जून २०२५ पर्यंत प्रस्ताव शासनाकडे सादर करावेत, अशा सूचना आढावा बैठकीत आ.प्रकाश सोळंके यांनी बैठकीदरम्यान देण्यात आल्या.आगामी पावसाळी अधिवेशनात या सर्व प्रस्तावांसाठी पुरवणी मागणी सादर करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.जनतेच्या मूलभूत सुविधांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा आमचा कटिबद्ध प्रयत्न सुरूच राहणार असल्याचे यावेळी आ.सोळंके यांनी सांगितले.या आढावा बैठकीसाठी उपविभागीय अधिकारी इंगोले, माजलगाव, वडवणी व धारुर येथील तहसीलदार व संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## अर्पिता मुंडेची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डॉ.सी.व्ही.रमन बालवैज्ञानिक परीक्षेत यशवंत ठरलेल्या सोमेश्वर शैक्षणिक संकुलाच्या कु.अर्पिता हरिहर मुंडे हीची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली असुन तीचे सर्वस्तरातुन अभिनंदन करण्यात येत आहे.



वर्ष २०२५ मध्ये संपन्न झालेल्या डॉ.सी.व्ही.रमन बालवैज्ञानिक परीक्षेसाठी सोमेश्वर कन्या प्रशालेच्या नऊ विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या असुन आठवीत शिकणारी कु.अर्पिता हरिहर मुंडे ही जिल्ह्यातुन सर्वप्रथम आली आहे. कु.अर्पिताची बेंगळुरु (कर्नाटक) येथील भारताच्या अंतराळ संशोधन आणि विकास संस्थेच्या (इस्त्रो) अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली असुन ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी कुटुंबातील अर्पितास सोमेश्वर शैक्षणिक संकुलात योग्य मार्गदर्शन लाभल्याने तीने यशाला गवसणी घातली आहे. विशेष म्हणजे योग्य मार्गदर्शन, अभ्यासातील सातत्य, मेहनतीमुळे अर्पिता एकाच वर्षात एनएमएमएस शिष्यवृत्ती, आठवी शिष्यवृत्ती व बालवैज्ञानिक परीक्षा अशी तिहेरी यशाची मानकरी ठरली आहे. आगामी काळात अर्पिता विमानाने बंगळुरुच्या इस्त्रो संस्थेत जाणार असुन तीच्या धवल यशाबद्दल संस्थाध्यक्ष डॉ.उध्दव शिंदे, सचिव अजित देशमुख, पान ३ वर

# शिवकृपेसाठी माऊली दादा प्रमाणे भक्ती करावी - प. पूज्य प्रदीप मिश्राजी

चाकरवाडी । प्रतिनिधी

शिव अनंत शिव कृपा अनंत शिवाला शरण या आयुष्यात सुखी आनंदी राहण्यासाठी शिव महादेवाला शरण या, शिव भोलेबाबा खूप दयाळू आहेत. आयुष्यात दु:ख कमी करून सुखी जीवन जगण्यासाठी भोले बाबांची भक्ती महत्त्वाचे आहे ज्ञानेश्वर माऊली दादा यांनी महादेवाची भक्ती करून सुखी जीवन जगले त्यामुळे माऊली दादा प्रमाणेच शिवकृपेसाठी भक्ती करा असे प्रबोधनपर विचार प. प्रदीप मिश्राजी यांनी मांडले.





## नामस्मरणाने चाकरवाडी दुमदुमली

विसाव्या शतकातील महान संत संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या २५ व्या पुण्यस्मरणानिमित्त रौप्य महोत्सवी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी प्रदीप जी मिश्रा बोलत होते. यावेळी लाखो भाविकांनी संत ज्ञानेश्वर माऊली यांचा जयघोष केला या जयभूषण आख्खी चाकरवाडी नगरी दुमदुली. यावेळी बोलताना प्रदीप मिश्राजी म्हणाले की, मनुष्याला दु:ख कष्ट कमी करण्यासाठी शिवाला शरण जाणे, शिव महादेवावर प्रखर विश्वास व श्रद्धा ठेवणे गरजेचे आहे. शिव भोलेबाबा सारखा दयाळू कृपाळू दाता या विश्वात कोणी नाही. शिवाची कृपा करून घेण्यासाठी श्रद्धेने भक्ती करणे गरजेचे आहे श्रद्धा असेल तर कोणतीही बघतीस सफल होते. भक्ती करत असताना देवावर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. नामस्मरण पान ३ वर

## पाटोद्यात प्रा.आ.केंद्रात डिलिव्हरी रेफरवर भर,डॉ नरेंद्र कासटचा मनमानी कारभार

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यामध्ये वहाली. कुसळंब.अमळनेर.डोंगरकिन्ही. नायगाव.दासखेड असे सहा प्राथमिक आरोग्य केंद्र असून यामध्ये सन एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत गरोदर माताची जवळपास १८०१ नोंदणी आहे.मात्र फक्त ९२ डिलिव्हरी वर्षेभरात प्राथमिक आरोग्य केंद्रात झाल्या आहेत १५५२ बाहेर खाजगी दवाखान्यात झाल्या आहेत तर महिन्याला एका प्राथमिक आरोग्य केंद्रात १० डिलिव्हरी होणे आवश्यक असताना मात्र तालुका आरोग्य अधिकारी यांच्या दुर्लक्षपणामुळे आरोग्य केंद्रात आलेल्या गरोदर मातांना बाळंतपणासाठी रेफर केले जात असून वहाली प्राथमिक आरोग्य केंद्रात तर वर्ष भरात एकही डिलिव्हरी झाली नाही याची चौकशी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ गंडाळ यांनी करून संबंधितावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. रेफरमुळे गोरगरीबाना आर्थिक झळ पोहोचत आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की पाटोदा तालुक्यामध्ये सहा प्राथमिक आरोग्य केंद्र असून यामध्ये वाहली. नायगाव . डोंगर किन्ही .अमळनेर. दासखेड. कुसळंब. या ठिकाणी असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तालुक्यातील जवळपास सन एप्रिल

पान ३ वर

# 'टॉस ने मारली बाजी'

## पुणे लघुपट महोत्सवात सर्वोकृष्ट प्रायोगीक लघूपटाचे बक्षिस

माजलगाव । प्रतिनिधी

पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या पंधराव्या पुणे शॉर्ट फिल्म फेस्टीवल-२०२५ मध्ये ए.डी फिल्म्स्? अंतर्गत तयार झालेला व दिग्दर्शक अमर देवणे यांनी स्वतंत्ररित्या दिग्दर्शीत केलेल्या टॉस या लघुपटाला सर्वोत्कृष्ट प्रायोगिक लघुपटाचा बहुमान प्राप्त झाला असुन हा पूरस्कार प्रसिध्द सिने पत्रकार श्रीकांत कुलकर्णी व दिग्दर्शक-निर्माते म्हणून परिचित आसलेले नितिन लचके यांच्या हस्ते देण्यात आला.

टॉस या लघुपटात विष्णू उगले यांची मुख्य भुमिका असुन त्यांनी मानसिक संतुलन हरवलेल्या मध्यमवर्गीय इसमाची घालमेल उत्तमरित्या पडद्यावर साकारली आहे.या लघुपटाचे पटकथा लेखन हे लेखक आर.प्रकाश यांनी केले असुन ध्वनी व कला दिग्दर्शन सौरभ धापसे व निकेश भांगे यांनी केले आहे. टॉस हा प्रयोगशील लघुपट कमी बजेट व कमी संसाधनामध्ये तयार केला आसल्याचे समजते.त्यामुळे या यशासाठी सर्व स्तरातुन टॉस च्या टिमचे अभिनंदन होत आहे.




हा पूरस्कार माझ्यासाठी एक दिग्दर्शक म्हणून खूप प्रेरणा देणारा आहे.अशाच वेगळ्या धाटणीच्या अन्य एका लघुपटावर काम चालू असुन तो ही सिनेमा फेस्टीवल गाजवेल असा विश्वास आहे.

-अमर देवणे (दिग्दर्शक -टॉस)

# शेतकऱ्यांची कर्जमाफी करुन मराठवाड्याला समन्यायी पाण्याचे वाटप झाले पाहिजे - भाई जयंत पाटील

## मराठवाड्यात नवीन युवकांना काम करण्याची संधी मिळणार

केज । प्रतिनिधी

मराठवाडा सातत्याने दुष्काळी झळा सहन करत असतो, तर पश्चिम महाराष्ट्र सह इतर काही भागात महापुरामुळे गावेची गावे पाण्याखाली येतात. वास्तविक मराठवाड्याचे हक्काची समन्यायी पाण्याची मागणी अनेक दिवसांपासून असताना देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे काही लोक केवळ मराठवाड्याला समन्यायी पाणी करण्याच्या केवळ वल्गाणा करून मराठवाड्यातील जनतेला वेड्यात काढण्याचे काम करत आहेत ही बाब शेतकरी कामगार पक्ष कदापी खपवून घेणार नाही तर मराठवाड्याला समन्यायी पाणी वाटप झाल्याशिवाय शेतकरी कामगार पक्ष स्वस्थ बसणार नाही अशी घोषणा शेतकरी कामगार पक्षाचे नेते सरचिटणीस भाई जयंत पाटील साहेब यांनी केली. पक्ष बांधणी संदर्भात नवीन चेहऱ्यांना संधी देणार असल्याचे वक्तव्य जयंत पाटील यांनी बोलुन दाखवले.




मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते प्रा एस व्ही पान ३ वर

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे बुधवार रोजी केशव म.चावरे यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील दहावी पुण्यतिथी जेष्ठ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.केशव महाराज चावरे अण्णा वारकरी मंडळ मराठवाडा अध्यक्ष यांचे बुधवार दि.११ जून २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मानकुरवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# एकीकडे युतीच्या चर्चा अन् पुण्यात थेट आदित्य ठाकरे-राज ठाकरेंचे बॅनर

पुणे । प्रतिनिधी

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे वाहु लागले असताना राज्याच्या राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून उद्धव ठाकरे शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या युतीच्या चर्चांही जोर धरू लागल्या आहेत. मनसे प्रमुख राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात युतीच्या चर्चा सुरू असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, उद्धव ठाकरे यांच्या गटातील नेत्यांकडूनही युतीबाबत सकारात्मक प्रतिसाद असल्याचे संकेत मिळत आहेत. या चर्चा सुरू असतानाच दोन्ही पक्षांतील नेत्यांमध्येही एक वेगळाच उत्साहाचे वातावरण असल्याचे दिसत आहे. याचेच एक उदाहरण पुण्यात दिसून आले. राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांचे फोटो एकाच बॅनरवर पाहायला मिळाले. पुण्यात राज ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना एकाच बॅनरमध्ये वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी (९ जून) राज ठाकरे पुणे दौऱ्या दरम्यानच पुण्यातील शिवसैनिकांकडून चौका-चौकामध्ये आदित्य ठाकरे आणि मनसेप्रमुख राज ठाकरे यांना एकाच बॅनरवर वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात एक मोठी राजकीय घडामोड होण्याची शक्यता आहे. शिवसेना (ठाकरे गट) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) या दोन्ही पक्षांमध्ये युती होणार का? हा प्रश्न सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे.

विशेष बाब म्हणजे, दोन्ही पक्षांतील काही वरिष्ठ नेत्यांनीही मनसे-ठाकरे युतीसाठी समर्थन दिले आहे., ठाकरे बंधू एकत्र आल्यास केवळ मुंबईच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकारणाला वेगळी कलाटणी मिळेल, अशा प्रतिक्रिया राजकीय वर्तुळातून येत आहेत. ठाकरे गटाचे प्रवक्ते व खासदार संजय राऊत यांनीही यावर सकारात्मक संकेत दिले



असून, भूतकाळात डोकावण्याऐवजी आता भविष्याकडे पाहायचं आहे, असे स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर उद्धव ठाकरे मनसेसोबत युती करण्याच्या भूमिकेत आहेत, असे स्पष्ट होत आहे.

# शिरूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई; गुटख्याचा मोठा साठा उघड करत १.१६ लाखांचा माल जप्त

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर पोलिसांनी एका मोठ्या कारवाईत तब्बल १.१६ लाखांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करत एकाला अटक केली आहे. ही धडक कारवाई पुणे-अहिल्यानगर बायपासजवळील जिओ पेट्रोल पंपासमोरील परिसरात करण्यात आली आहे. ही कारवाई ०८ जून रोजी सायंकाळी पावणे आठ वाजण्याच्या सुमारास केली.

या प्रकरणी हिमांशु धर्मवीर सिंग (वय २३, रा. अहिल्यानगर, पुणे रोड) याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस कॉन्स्टेबल नितेश थोरात यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे





पोलीस पथकाने आदित्य स्नॅक्स सेंटरच्या मागील खोलीवर छापा टाकला. या छाप्यात प्रतिबंधित अन्नपदार्थांचे मोठ्या प्रमाणावर साठवणूक असल्याचे निष्पन्न झाले. सदर प्रतिबंधित माल विक्रीसाठी बेकायदेशीररित्या साठवल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे स्थानिक परिसरात गुटखा विक्रीवर चांगलाच आळा बसणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेचा पुढील तपास शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक चव्हाण हे करत आहे

दरम्यान, शिरूरमध्ये गुटखा व तंबाखूसारख्या आरोग्यविघातक पदार्थांचा साठा करून विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी उचललेले पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. या प्रकारावर कठोर कारवाई होत राहिल्यास अशा गैरप्रवृत्तींचा बंदोबस्त होऊ शकेल, असे मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले.

# व्हीनस कला महोत्सव आजपासून

पुणे । प्रतिनिधी

व्हीनस ट्रेडर्सच्या ५१व्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित व्हीनस कला महोत्सवाला मंगळवारपासून (ता. १०) सुरुवात होत आहे. रविवारपर्यंत (ता. १५) सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत घोले रस्त्यावरील राजा रविवर्मा कलादालनात हा महोत्सव सर्वांसाठी खुला असेल, अशी माहिती महोत्सवाचे आयोजक सुरेंद्र करमचंदानी यांनी दिली. महोत्सवाचे हे अकरावे वर्ष असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महोत्सवात कला प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा, अनेकविध कार्यशाळा यांची रेलचेल असेल. तसेच, व्यावसायिक कलाकार, हौशी कलाकार, कला शाखेचे विद्यार्थी आणि शालेय विद्यार्थी यांच्या चित्रांचे प्रदर्शन पाहता येणार आहे. महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन मंगळवारी सायंकाळी पाच वाजता खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे.

'संगीत संध्या' मैफील गुरुवारी

सवाई गंधर्वांचे नातू आणि स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी यांचे ज्येष्ठ शिष्य पं. श्रीकांत देशपांडे यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी शीला देशपांडे आणि पं. श्रीकांत देशपांडे मित्रमंडळ यांच्यातर्फे गुरुवारी (ता. १२) 'संगीत संध्या' या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कोथरूडच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सायंकाळी पाच वाजता ही मैफील होणार आहे. या मैफिलीत ज्येष्ठ धृपद गायक पं. उदय भवाळकर आणि ज्येष्ठ शास्त्रीय गायिका विदुषी आरती अंकलीकर-टिकेकर यांचे गायन होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

# पुण्यातील 'रुबी हॉल'मध्ये डॉक्टरची आत्महत्या; कागदावर मोबाईलचा पासवर्ड लिहीत संपवलं जीवन

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील प्रसिध्द रुबी हॉल क्लिनिकमध्ये काम करणारे निवासी डॉक्टर डॉ. श्याम व्होरा यांनी वसतीगृहात गळफास घेत आत्महत्या केली. ही घटना रविवारी रात्री दहाच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार डॉ. व्होरा यांनी बराच वेळ दरवाजा उघडला नाही म्हणून सुरक्षा रक्षकाने दरवाजा तोडला. तेव्हा व्होरा हे गळफास घेतलेल्या अवस्थेत सुरक्षा रक्षकाला दिसले. दरम्यान रुममध्ये एक चिठ्ठी आढळली असून त्यांनी त्यात





मोबाईलचा पासवर्ड लिहून ठेवला आहे. यामुळे पोलिसांनी मोबाईल तपासासाठी ताब्यात घेतला आहे. तपासाअंती त्यांच्या आत्महत्येचे कारण कळू शकेल. डॉ. व्होरा हे मुळचे गुजरातचे असून त्यांच्या कुटूंबाला पोलिसांनी खबर दिली आहे. ते पुण्याच्या दिशेने रवाना झाले आहेत.डॉ.व्होरा यांच्या आत्महत्येने त्यांच्या सहकाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. रुग्णालयातील डॉक्टर घटनेसंदर्भात प्रतिक्रिया देण्यास नकार देत आहेत. एकंदरच रुग्णालयातील वातावरण गंभीर होते. डॉ. व्होरा यांच्यावर कामाचा तणाव होता की इतर काही हे अद्यापही समजू शकले नाही. मात्र डॉ.व्होरा यांचा स्वभाव हसत खेळत होता. यामुळे सहकाऱ्यांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### चौकशी पुर्ण होईपर्यंत निष्कर्ष काढू नये : रुबी हॉल

**दरम्यान, रुबी हॉल क्लिनिकच्यावतीने कायदेशीर सल्लागार मंजुषा कुलकर्णी यांनी खुलासा केला आहे की, आमच्या निवासी डॉक्टरांपैकी एक, डॉ. श्याम व्होरा यांनी त्यांच्या वसतिगृहाच्या खोलीत आत्महत्या केली. ही दुर्दैवी बातमी सांगताना आम्हाला खूप दुःख होत आहे. सध्या पोलिसांकडून या प्रकरणाची चौकशी सुरु आहे.**



# बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्ज; ठगास अटक

पुणे । प्रतिनिधी

आरोपीने चिंचवडमधील एका व्यक्तीच्या नावाने १८ लाखांचे, दुसर्या दोन व्यक्तींच्या नावाने अनुक्रमे १८ लाख आणि १५ लाखांचे असे एकूण ५१ लाखांचे वैयक्तिक कर्ज घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. याशिवाय त्याच्याकडे आणखी २० व्यक्तींच्या नावाने कर्जासाठी तयार केलेल्या फाईल्सही आढळून आल्या. आरोपीला तपासासाठी चिंचवड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त सारंग आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक रविकिरण नाळे, सहायक निरीक्षक प्रवीण स्वामी, उपनिरीक्षक प्रकाश कातकाडे, पोलिस अंमलदार अतुल लोखंडे, प्रिया वसावे, हेमंत खरात, दीपक भोसले, नितेश बिच्चेवार, सुरंजन चव्हाण, स्वप्निल खणसे, विशाल निश्चित, महेश मोटकर यांनी ही कामगिरी केली.

# 'कसोटी' संपली तर 'क्रिकेट'चा अंत निश्चित! माजी कर्णधार वेंगसरकर यांचा गंभीर इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट किती टिकेल माहीत नाही. पण, कसोटी क्रिकेट संपले तर क्रिकेट संपून जाईल. कारण कसोटी क्रिकेट हे अल्टिमेट क्रिकेट आहे, असे भारतीय क्रिकेट संघ निवड समितीचे माजी अध्यक्ष आणि माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी सोमवारी व्यक्त केले.





पुणे पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार संघाचे संस्थापक कै. ज. स. करंदीकर व्याख्यानमालेत ते बोलत होते. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे, सरचिटणीस मिनाक्षी गुरव उपस्थित होते.

वेंगसरकर म्हणाले, 'कसोटी क्रिकेट हा सगळ्याच आव्हानात्मक फॉरमॅट आहे. कसोटी क्रिकेटचा फॉरमॅट वेगळा असून प्रत्येक सेशन महत्त्वाचे असते. प्रेक्षकांना काय हवे त्यावरही तुम्हाला लक्ष केंद्रित करावे लागते. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड सारख्या देशांमध्ये कसोटी क्रिकेट बघायला प्रेक्षकांची गर्दी होते.'

'भारतीय संघ सध्या इंग्लंडच्या दौर्यावर आहे. पहिल्या दोन कसोटी सोमन्यावरच संपूर्ण मालिकेचे भवितव्य लक्षात येईल. इंग्लंडमध्ये बॉल स्विंग होत असतात. आपला संघ तिथल्या वातारणाशी जेवढे लवकर जुळवून घेईल तेवढे चांगले आहे. शुभमन गिल, यशस्वी जैस्वाल, के.एल. राहुल यांच्याकडे या मालिकेच्या निमित्ताने चांगली संधी आहे. सगळेच म्हणतात अनुभव नाही, अनुभव नाही. पण, खेळल्याशिवाय अनुभव मिळणार नाही. भारताचा संघ भक्कम आहे. त्यामुळे आपला संघ तिथे चांगली कामगिरी करेल,' अशी आशाही वेंगसरकर यांनी व्यक्त केली.

# सावत्र पित्याकडून अल्पवयीन मुलीला विकण्याचा प्रयत्न; मुलीच्या धाडसामुळे धक्कादायक प्रकार उघडकीस

पुणे: पश्चिम बंगालमध्ये मावशीकडे राहणार्या अल्पवयीन मुलीला पुण्यात आणून कुंटणखान्यात विकण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सतरा वर्षे वयाच्या मुलीने दाखवलेल्या धाडसामुळे हे प्रकरण उघडकीस आले असून, याप्रकरणी सहकारनगर पोलिसांनी ३९ वर्षीय सावत्र पित्यावर गुन्हा दाखल केला आहे. (डरींशीीं झींपश छशुी)

यासंदर्भात पोलिसांनी सांगितले की, दोन वर्षे वयाची असतानाच वडिलांचे निधन झाल्याने ही धाडसी मुलगी आपल्या मावशीसमवेत पश्चिम बंगालमधील होशियाबादमध्ये राहात होती. तर, तिची आई गेल्या १५ वर्षांपासून आपल्या दुसर्या पतीसोबत पुण्यातील धनकवडी परिसरात वास्तव्यास होती.

फळविक्रीचा व्यवसाय करणारा तिचा सावत्र पिता पंधरा- वीस दिवसांपूर्वी पश्चिम बंगालमध्ये तिच्या मावशीच्या घरी गेला. आपल्या नातेवाईकाचे लग्न असल्याचा बनाव करून त्याने या मुलीला जबरदस्तीने पुण्यात आणले व एका खोलीत डांबून



ठेवले. त्यानंतर फोनवरून त्याने मुलीला विकण्यासंबंधीची चर्चा सुरू केली.खोलीत बंद असलेल्या या मुलीने ही चर्चा ऐकली व तिला जबरदस्त धक्का बसला. पश्चिम बंगालमध्ये राहिलेली असल्याने तिला फक्त बंगाली भाषाच येत होती. त्यामुळे काय करावे, हे तिला सुचेना. मात्र, मुंबईत राहणार्या दुसर्या मावशीसोबत संपर्क साधून तिने स्वतःवर बेतलेला हा प्रसंग सांगितला.मात्र, हा कौटुंबिक प्रश्न असल्याचे कारण पुढे करून तिने मदत करण्याचे टाळले. तथापि, नंतर तिला स्वतःच्या वागण्याचा पश्चाताप झाला. म्हणून तिनेच मुंबईतील एका स्वयंसेवी संस्थेशी संपर्क साधून सावत्र पित्याच्या कचाट्यात अडकलेल्या आपल्या अल्पवयीन भाचीची सुटका करण्याची विनंती केली आणि या दुर्दैवी मुलीच्या सुटकेच्या प्रयत्नाला गती आली.या स्वयंसेवी संस्थेतील कार्यकर्त्यांनी वेळ न दवडता त्यांच्या पुण्यातील शाखेशी संपर्क साधला. त्यानंतर पुण्यातील कार्यकर्त्यांनी घरात डांबून ठेवलेल्या या तरुणीचा मागोवा घेतला. धनकवडी परिसरात तिचा सुगावा लागताच त्यांनी गुन्हे शाखा आणि सहकारनगर पोलिसांची मदत मागितली.पोलिसांनीही वेगाने हालचाल करून तिची सुटका केली व तिला सुधारगृहात पाठविले. दुसर्या दिवशी तिला बाल न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने तिची वैद्यकीय तपासणी करून तिला सध्या रिमांड होममध्येच ठेवण्याचे आदेश दिले.वैद्यकीय तपासणीनंतर व मुलीने दिलेल्या तक्रारी आधारे तिच्या सावत्र वडिलांवर गुन्हा दाखल करण्याचा आदेश बाल न्यायालयाने दिला. त्यानुसार सहकारनगर पोलिसांनी तिच्या सावत्र वडिलांवर गुन्हा दाखल केला आहे.पीडित मुलीला पुन्हा पश्चिम बंगालमधील आपल्या मावशीकडे जायचे आहे. याप्रकरणी बाल न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हा दाखल केला असून, तिच्या सावत्र वडिलांना लवकरच अटक करण्यात येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुल गौड यांनी दिली. पोलिस निरीक्षक सुरेखा चव्हाण या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# सहा लाख घरांमध्ये पोहोचणार संविधान

पिंपरी । प्रतिनिधी

महापालिकेच्या वतीने शहरातील सहा लाख घरांमध्ये संविधान उद्देशिकाचे वितरण करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्राबाई फुले स्मारक येथे शनिवारी (दि. ७) प्रारंभ करण्यात आला. यावेळी फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी 'भारतीय संविधानाचा गौरव' या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, समाज विकास विभागाच्या संतोषी चोरगे, माजी शहर अभियंता महावीर कांबळे, माजी कार्यकारी अभियंता वसंत साळवी, महापालिकेचे निवृत्त





अधिकारी अनिल सूर्यवंशी, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब रोकडे, धुराजी शिंदे, राजेंद्र साळवे, संतोष जोगदंड, मनोज गजभार, तुकाराम गायकवाड, दीपक म्हस्के, सुरेश रोकडे, नरेंद्र बनसोडे, कविता म्हस्के, प्रमिला ठोंबरे, मंजू जैस्वाल आदी उपस्थित होते.

प्रा.डॉ. पवार म्हणाले, ''भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या भारतीय संविधानातील प्रत्येक कलम हे मानवी मूल्यांचे रक्षण करणारे आहे, आम्ही भारताचे लोक या भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेच्या शब्दातच देशाला एकता, अखंडता व समानतेत गुंफले आहे. प्रत्येकाला समानतेचा अधिकार दिलेला आहे. याशिवाय आपले मत व्यक्त करण्याचा, आपल्या मनाप्रमाणे नोकरी, उद्योग, व्यवसाय करण्याचाही अधिकार दिलेला आहे.

आपल्या संविधानामुळे देशात प्रत्येक जाती-धर्माचे नागरिक गुण्यागोविंदाने राहत आहेत. याच एकतेच्या जोरावर भारताने विविध क्षेत्रात प्रगती करत जागतिक स्तरावर आपल्या देशाचे स्थान उंचावले आहे. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त 'घर घर संविधान' उपक्रमांतर्गत शहरातील नागरिकांच्या घरोघरी जाऊन उद्देशिका वितरणाचा अत्यंत स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे.

# सासवडमध्ये पथविक्रेत्यांकडून दुप्पट 'जागा भाडे' वसुली

सासवड । प्रतिनिधी

सासवड शहरातील जिजामाता फळे-भाजीपाला बाजारामधील पथविक्रेत्यांकडून अचानकपणे दुप्पट 'जागा भाडे' (दैनिक कर) वसूल केल्याने पथविक्रेत्यांत खळबळ उडाली आहे. कोणतीही पूर्वसूचना, जाहीर नोटीस किंवा वर्तमानपत्रात जाहिरात न देता 'अंकुर डव्हर्टायझिंग' या कंपनीने दोन दिवस ५० रुपयांऐवजी १०० रुपये प्रतिदिन कर वसुली केल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

या मनमानी वसुलीविरोधात जिजामाता फळे-भाजीपाला बाजारातील पथविक्रेत्यांनी गुरुवारी (ता. ५) सासवड नगरपालिकेत मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांची भेट घेऊन निवेदन दिले. विक्रेत्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्यानंतर, मुख्याधिकारी डॉ. चव्हाण यांनी, अशी कोणतीही करवाढ वसुलीसाठी तोंडी किंवा लेखी निर्देश दिलेले नसल्याचे स्पष्ट करीत संबंधित अभिकर्त्यांना म्हणजेच 'अंकुर डव्हर्टायझिंग' कंपनीला लेखी समज देण्याचे आश्वासन दिले आहे.



यावेळी जिजामाता फळ व भाजीपाला विक्रेते संघटनेचे अध्यक्ष माजी नगरसेवक हरून बागवान, उपाध्यक्ष सुनीता होले, सचिव गणेश बुद्धिवंत यांच्यासह राजेंद्र होले, रेखा बुद्धिवंत, विमल लवांडे, विकास बुद्धिवंत, सुवर्णा होले, मनोज होले, मालन पवार, साहिल बागवान, उबेद बागवान, सविता जाधव, पुष्पा मनोज होले, कल्पना जालिंदर काळे, उमेश राऊत, कलाबाई पवार, गुंडाराव कल्लशेट्टी, लीलाबाई धोत्रे आदी पथविक्रेते उपस्थित होते.

गुरुवारी (ता. ५) आम्ही पथविक्रेते मुख्याधिकाऱ्यांना भेटल्यावर त्यांनी जास्तीचे पन्नास रुपये न देण्याबाबत सांगितले. तरीही पुन्हा ठेकेदाराच्या माणसाकडून पथविक्रेत्यांकडे शंभर रुपयांची मागणी केली. मात्र त्याला पथविक्रेत्यांनी, आम्ही मुख्याधिकाऱ्यांना भेटलो असून त्यांनी सांगितल्याप्रमाणेच जागा भाडे देणार असे सांगितल्याचे हरून बागवान म्हणाले

cmyk